# आई

यतार

ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय का.वा
दा. क्र. २७७२



BVBK-0402772

अश्वमेध
प्रकाशन

ग्रा. वा.
2662
9/5/93

# आई

2662 9/5/93
ग्रा. वा.

विजय तारे

BVBK-0402772

**प्रकाशन क्र. ४२**

**प्रकाशक / मुद्रक**
अश्वमेध प्रकाशन
रमेश न. वाडेकर
कृष्णनिवास मानपाडा रोड,
डोंबिवली पूर्व - ४२१२०१

**लेखक**
विजय च. तारे

**प्रथम आवृत्ती :** १२ फेब्रुवारी, १९९३

© **प्रकाशकाच्या स्वाधीन**

**मुखपृष्ठ**
मुकुंद तळवळकर

**अक्षरजुळणी**
अभिषेक टाईपसेटर्स
१२६५, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

**मुद्रणस्थळ**
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
पुणे - ४११०३०

**किंमत - २५ रुपये**

*'आई' हे केवळ व्यक्तिवाचक सामान्यनाम नसून ती एक प्रवृत्ती आहे असे मला वाटते. अशा प्रवृत्तीच्या व्यक्तींचे प्रतिनिधी म्हणून हे पुस्तक ती. सौ. आई व ती. दादांस कृतज्ञता पूर्वक समर्पण!*

## दोन शब्द

काही गोष्टी आपण अशा बघतो, ऐकतो, वाचतो, की त्या दुसऱ्या कुणाला तरी सांगितल्याशिवाय आपले मन शांत होत नाही. प्रस्तुत पुस्तक म्हणजे अशाच काही गोष्टींचा समूह !

हे पुस्तक आपल्यापर्यंत येईतोवर बऱ्याच जणांनी कष्ट घेतले. विशेष करून अश्वमेध प्रकाशनचे श्री. वाडेकर यांनी प्रूफ रीडिंगचे काम आपणहून स्वत:कडे घेतले. चित्रकार श्री. मुकुंद तळवलकर यांनी मुखपृष्ठाच्या माध्यमातून समर्थपणे सादर केलेली 'आई', माझी मावशी सौ. मंदा अनगळ व बहीण नमूताई ह्यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना व मार्गदर्शन, तसेच श्री. प्रवीण दवणे यांनी पुस्तकाच्या मांडणीबद्दल केलेले मार्गदर्शन, या सर्वांचा मी ऋणी आहे.

आपल्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास उत्सुक आहे व आतुरतेने वाट बघत आहे.

धन्यवाद,

**विजय च. तारे**
चिंचवड, पुणे ३३.

२६६२

# आई

"कुपुत्रो जायेत क्वचिदपि
कुमाता न भवति।"

मुले वाईट निपजणे काही अशक्य नाही, पण दुष्ट आई, वाईट आई शोधूनही सापडणार नाही, किंबहुना शोध घेण्याची गरजच नाही, कारण ती अस्तित्वातच नाही. 'देवी अपराध क्षमापन' स्तोत्रातील ह्या ओळी! केवढा विश्वास आहे आईवर! केवढी निष्ठा! साऱ्या जगतातले मांगल्य आईजवळ साठवले आहे. साऱ्या विश्वातील पवित्रता आईजवळून उगम पावलेली आहे. अशा आईकरिता काय वाट्टेल ते करावे लागो, तिला दुःख भोगू द्यावयाचे नाही, कारण ती पवित्र आहे, ती पहिला देव आहे. उपनिषदकार देवांची मोजणी करताना प्रथम स्थान आईला देतात. अगोदर 'मातृदेवो भव' मग 'पितृदेवो भव' अशा ह्या थोर आईसंबंधी आज आपण काही गोष्टी वाचूया.

तसे पाहावयास गेल्यास आजपर्यंत अनेकांनी आपले आईसंबंधीचे विचार, मत, भावना आपापल्या परीने व्यक्त केल्या आहेत. मग त्याला जात, भाषा, धर्म, प्रांत इत्यादी कोणत्याही गोष्टीचे बंधन नाही. जगामधे अशी एकही भाषा नसेल की ज्यामधे आईसंबंधी लिखाण झाले नसेल.

आपल्या मराठी भाषेतील 'शामची आई' हे 'साने गुरुजींचे' पुस्तक माहीत नाही, असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. 'शामची' आई तुम्हा - आम्हा सर्वांनाच पटते, आवडते, कारण ती आपल्या आई सारखीच आहे म्हणून! आणि म्हणूनच ते पुस्तक कितीही वेळा वाचले तरी त्याची गोडी काही कमी होऊ शकत नाही. ह्या पुस्तकाबरोबरच आणखीन देखील बरीच पुस्तके आपल्याकडे ह्या विषयावर आहेत. त्यामधे 'दुधाची घागर' हे कै. य.गो. जोशी यांचे पुस्तक वाचण्यासारखे आहे.

'मातृ - गीता' श्री. गोवर्धन डोळस यांचे, श्री. रा.कृ. यांचे 'सौ. सीताबाई

कुंडईकर यांचा अल्पपरिचय',

'सुमाता व पयोव्रत' हे कीर्तन वाचस्पती वा.शि. कोल्हटकर यांचे वैशिष्ट्यपूर्ण असे पुस्तक, श्री. प.स. देसाई यांचे 'राष्ट्र देवी महात्म्य' हे पुस्तक,

श्री. गो.नी. दांडेकरांची 'आईच्या आठवणी' ही पुस्तक मालिका,

आणि अन्य कितीतरी अशी पुस्तके वाचनीय आहेत.

आज आपण आईसंबंधीच्या अशाच काही सत्य, पौराणिक, ऐतिहासिक, व काल्पनिक गोष्टींचा विचार करू या!

नास्ति मातृसम छाया नास्ति मातृसमो गतिः।
नास्ति मातृसम शरणं. नास्ति मातृसमाप्रिया:॥

महाभारतातील शांतीपर्वातील ह्या श्लोकात आईची महती सांगतानाचे वर्णन किती सुरेख केले आहे, 'मातेसारखा दुसरा आधार नाही, छत्र नाही, आणि तिच्या शिवाय दुसरे गत्यंतरही नाही. मातेसारखी दुसरी शक्ती नाही, तसेच तिच्या सारखे दुसरे प्रिय पण नाही.'

गोष्ट आहे बौध्द साहित्यातील. भारतीय इतिहासात पितृहत्येची अनेक उदाहरणे आहेत पण मातृहत्येची जवळजवळ नाहीतच. परशुरामाने आपला पिता जमदग्नि याच्या आज्ञेवरून आपली माता रेणुका हिचा वध केला हे सर्वात प्रसिध्द उदाहरण. परंतु ही कथा पितृभक्तीतून जन्माला आली आहे. अणि पित्याने 'वर माग' असं सांगताच परशुरामाने प्रथम पुन्हा मातेला जिवंत करण्याचाच वर मागितला. तर ही झाली आपणा सर्वाना ठाऊक असलेली गोष्ट. पण आता आपण वाचूया बौध्द साहित्यातील गोष्ट. अजातशत्रू नावाचा राजपुत्र आपल्या पित्यास-बिंबिसार राजा त्याचे नाव - तुरुंगात उपाशी ठेवून मारणार होता. परंतु ह्या राजास अजातशत्रूची आई - राणी - जेव्हा भेटायला जात असे, तेव्हा ती आपल्या शरीरावर मधाचा लेप लावून जात असे व तो मध खाऊन राजा बिंबिसार बरेच दिवस जिवंत राहू शकला. जेव्हा ही गोष्ट अजातशत्रूला समजली तेव्हा तो आपल्या मातेस मारण्यास सिध्द झाला. त्यावेळी मंत्र्यानी म्हटले की, "अठरा हजार दुष्ट राजांनी आपल्या पित्याची हत्या केली आहे, पण मातेची हत्या अद्याप कोणीही केली नाही." हे ऐकून अजातशत्रूसारखा दुष्ट राजासुध्दा आपल्या आईला मारण्याच्या विचारापासून परावृत्त झाला. ह्या उलट ऋषी सुमंतूने म्हटले आहे,

"आयुः पुमान् यशः स्वर्ग कीर्ति पुण्यं बलं श्रियम्।
पशुं सुखं धनं धान्यं प्राप्नुयान्मातृवन्दनात्॥

मातेची सेवा करणाऱ्याला दीर्घायुष्य, यश, स्वर्ग, कीर्ती, पुण्य, बल,

लक्ष्मी, पशू, सुख, धन, धान्य, इत्यादी गोष्टी सहज प्राप्त होतात.

साधारण तिसऱ्या - चौथ्या महिन्यात मूल किंचित हसायला लागते. तसे पाहता हसण्याची क्रिया ही रडण्याच्या क्रियेतूनच झालेली असते. ते लहानगे, माता कशीही वागली तरी निर्धास्त असते कारण 'आपल्याला धोका वाटला पण तो जाणवला नाही' या विचारांची .खूण म्हणून ते वारंवार हसू लागते. शरीरदृष्टया हसण्याची जन्मकथा ही अशी आहे की, जी आईमुळे संभवते. मानसशास्त्र आईचा उचित गौरव करताना म्हणते की, पित्याला प्रथम ओळखणारे मूल कदाचित चलाख होत असेल पण मातेला प्रथम ओळखणारे मूल हे हसरे व खेळकर असते यापेक्षा आईची अधिक महती ती काय वर्णावी? ती अशा गुणांनी युक्त असते, म्हणूनच मुलाच्या दृष्टीने ती त्याचे भवितव्य घडवू शकते, उज्ज्वल करू शकते.

तर असे हे लहान मूल दिसामासाने वाढत असते. ह्या लहानग्या बाळाला अर्थातच सर्वांहून अधिक प्रिय कोण असेल तर ती माता! ५ - ७ महिन्यांच्या ह्या बाळाचे काही विचार दृढ असतात. आपली आई जे काही करते ते बरोबर आणि इतर कोणी काही करत असतील तर ते चूक, हे विचार त्यावेळेपासून त्याच्या मनात पक्के रुजलेले असतात. लहान मुले अनुकरणप्रिय असतात. न बोलता देखील ती बरेच काही समजत असतात. तसे पाहता चेहऱ्यावरून विचार जाणण्याचे शास्त्र फारसे प्रगत झाले नसले तरी त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे हे लहानगे बाळ. निदान माता तरी कुठलाच विचार आपल्या ह्या लहानग्या बाळापासून लपवून ठेवू शकत नाही.

एकीकडे हे लहानगे मूल मोठे होत असते. ते मोठे होत असताना आई त्याच्याकरिता काय करत नाही? आपण आपल्या रोजच्या जीवनातच बघतो. आपल्याला आई सकाळी उठवायला येते, तेव्हा तिचा आपल्यासाठी डबा तयार करून झालेला असतो. आंघोळीसाठी गरम पाणी करून झालेले असते आणि मग ती आपल्याला उठवायला आलेली असते. एकीकडे तिचे आपल्याला हाक मारणे चाललेले असते. "अरे सोन्या ऊठ, ऊठ रे माझ्या राजा, ऊठ रे तुला शाळेत जायचे आहे ना" अशा हाका मारणे चालले असताना दुसरीकडे तिचे काहीना काही काम चालले असतेच. कधी कधी अशा हाका मारण्याने आपण उठत नाही. उठायचा आळस करतो. छानदार झोप लागलेली असते ना! उठणे अगदी नक्को वाटत असते! आणि नेमकी अशावेळेस ती आईची हाक ऐकू आली की आपण मनातल्या मनात म्हणतो सुद्धा की काय ही आईची कटकट आहे. हे सगळं चाललेलं असताना "अजून कसा उठत

नाही ते मी बघतेच हं" असं म्हणत क्वचित प्रसंगी आपल्याला रट्टा देखील खावा लागतो. त्यावेळच्या खाव्या लागणाऱ्या त्या रट्ट्याचे महत्त्व, त्यामागची आपुलकी, कळकळ, जिव्हाळा कालांतराने आपल्याला समजतो, पण निदान त्यावेळेस तरी आईचा आपल्याला अस्सा राग आलेला असतो की नाही, की बस्स! शेवटी एकदाचे आळोखेपिळोखे देत आपण गादीवरून बाहेर येतो. तर लगेच ब्रशवर पेस्ट लावण्यापासून ते आंघोळीची तयारी, शाळेचा पोशाख घालणे, दूध प्यावयाला लावणे व मग शाळेत पोहोचवणे इत्यादी कार्यक्रम ती न चुकता न कंटाळता करत असते. खरं म्हणजे, रोज रोज उठून शाळेत जायचा तर आपल्याला बुवा खूप कंटाळा येतो. कामावर जायचा, बाबा सुद्धा कधी कधी कंटाळा करतात. पण केव्हाही बघावं तर ही न कंटाळा करता हिचे काहीना काही चाललेलं असतं. हिला कधीच कसा कंटाळा येत नाही? आपल्या मनात विचार देखील येतो की ही विश्रांती तरी कधी घेत असेल? केव्हाही बघावे तर हिचे काहीना काही चालूच असते. असा विचार मनात येतो खरा पण आल्यासारखा आपल्या मनातून विचार निघूनही जातो, कारण एव्हाना आपल्या कळत म्हणा किंवा नकळत तिच्याकडून कामं करून घ्यायची एवढी सवय लागून गेलेली असते की, आपण आपल्यासाठी आईला काही त्रास देत आहोत हे आपल्या मनातही येईनासे होते आणि आईचे म्हणाल तर तिला कामाची एवढी सवय होऊन गेलेली असते की काम करताना आपल्याला ताण पडतो आहे, आपली ओढाताण होत आहे, असं तिला जरासुद्धा वाटत नाही. तिचे ते तसे वागणे सहज स्वाभाविक असते. आपल्याला हळूहळू आईची आता एवढी सवय झालेली असते की तिच्या शिवाय एक क्षणभर देखील राहू शकत नाही. आई आपल्याला न दिसणे हे सुद्धा आपल्याला सहन होत नाही. तुकाराम महाराजांनी म्हटले आहेच.

"मायेविण बाळ क्षणभरी न राहे।
न देखता होय कासावीस॥"

तर अशी ही आई, आपल्या मुलाकरता कष्ट करणारी, झटणारी, सर्वांच्या परिचयाची आहे. पण आता गोष्ट सांगणार आहे ती एका कर्तव्यनिष्ठ आईची.

गोष्ट आहे एका लहानशा बाळाची. बाळ चिलया त्याचे नाव आणि आपल्या मुलावर जिवापाड प्रेम करणाऱ्या राजा - राणीची. अर्थात राजा श्रियाळ व राणी चांगुणा ह्यांची. खूप प्रेम करणाऱ्या या राजा - राणीच्या महाली साक्षात शंकरदेव, त्यांची परीक्षा घेण्यासाठी म्हणून आले. आले ते एका

गरीब ब्राह्मणाच्या वेषात. इकडे राजा - राणी 'अतिथिदेवो भव' म्हणून ह्या गरीब ब्राह्मणाच्या स्वागतास सज्ज होतात. ती वेळ जेवणाची असल्याने त्या ब्राह्मणास जेवणास बसण्यास सांगतात, तर तो ब्राह्मण इच्छाभोजन व्यक्त करतो. म्हणतो, "मला जे जेवायला पाहिजे आहे तेच देणार असाल तर थांबतो." आता हे तर काय राजा - राणी, ह्यांना कशाचे काय कमी? ते लगेच बरं म्हणतात. तशी हा ब्राह्मण म्हणतो, "मला यजमानाच्या मुलाचे म्हणजे तुमच्या बाळ चिलयाचे कांडलेले मांस पाहिजे." जीवापुलीकडे जपलेल्या ह्या आपल्या एकुलत्या एक मुलाला मारावयाचे! ते सुद्धा कांडून! त्यांना तर रडूच कोसळते. तशी हा ब्राह्मण म्हणतो,

"त्याला मारताना, कांडताना जर रडणार असाल तर मला तुमचे जेवण नको, हा मी चाललो."

डोळे पुशीत व चेहऱ्यावर हास्य आणत हे दोघं आपलं कार्य पुढे चालू ठेवतात. आता आपल्याच मुलाला मारून, कांडणं हे कोणाला तरी सहन होईल का? आणि ते सुद्धा स्वतःच्या हाताने. पण करणार काय? कारण तशी त्या ब्राह्मणाची अटच असते, मुळी. कसंतरी करत चेहऱ्यावर हास्य आणत हे दोघे जेवण रांधतात. आणि ह्या ब्राह्मणास जेवण्यास चलण्यासंबंधी विनवतात. तर हा ब्राह्मण म्हणतो कसा, "तुम्ही दोघंच, तुम्हाला मूलबाळ काही नाही. निपुत्रिकांच्या घरी मी जेवत नसतो, हा मी चाललो."

तेव्हा ही दोघं त्या ब्राह्मणाची पुन्हा विनवणी करू लागतात. मग हा ब्राह्मण त्यांना त्यांच्या मुलाला हाक मारायला सांगतो आणि काय आश्चर्य! ह्यांची हाक कानी येताच बाळ चिलया नेहमीसारखा दुडूदुडू धावत येतो. आई पटकन् कडेवर घेते व त्याचे पटापट मुके घेऊ लागते. अशा रीतीने कर्तव्यनिष्ठ राजा - राणी शंकराने घेतलेल्या परीक्षेस उतरतात.

ही गोष्ट झाली पौराणिक काळातील. पण आता जी गोष्ट सांगणार आहे, ती आहे एक ऐतिहासिक सत्य घटना. अशा आईची की, जी कर्तव्यापुढे आपल्याला प्राणाहून प्रिय असलेल्या मुलाच्या मृत्यूला सामोरे जाण्यास सिद्ध होते. चितोडचा राजा संग्रामसिंह हा फार शूर म्हणून प्रसिध्द होता. ह्या राजाच्या निधनानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र विक्रमादित्य गादीवर बसला. दुर्दैवाने राज्यकर्त्यास आवश्यक असणारे शौर्य व बुद्धी हे दोन्ही गुण त्याच्याकडे नसल्याने त्याला राजसिंहासनावरून खाली उतरवण्यात आले. राज्यकारभार मंत्र्यांच्या हाती देण्यात आला. विक्रमादित्याचा पुत्र उदयसिंह हा त्या वेळी अगदीच लहान असल्याने त्याच्या वतीने राज्यकारभाराची धुरा मंत्र्यांनी वाहण्याचे ठरवले. ह्या लहानशा

उदयसिंहाची जबाबदारी त्याची आई कर्णावती ही स्वर्गवासी झाल्याने, पन्ना नावाच्या दासीकडे करण्यात आली होती. पन्नादाई देखील त्याचे संगोपन मनापासून करीत असे. ह्या वेळी राज्याचे रक्षण संग्रामसिंहाचा दासीपुत्र वनवीर हा करत असे. पण राज्यातील हे झालेले बदल व एकंदर परिस्थितीचा फायदा घेण्याचा मोह त्या दासीपुत्राला झाला. ह्या मोहातूनच त्याने राजा विक्रमादित्य व त्यांचा पुत्र उदयसिंह ह्यांना मारावयाचा कट केला. आधी निश्चित केल्याप्रमाणे एका रात्री त्याने तलवारीसह राजभवनात प्रवेश करून राजा विक्रमादित्यास ठार मारले. बातमी पसरण्यास वेळ लागला नाही. एका आचाऱ्याकडून ही बातमी पन्नादाईस समजली. राजपुत्र उदयसिंह अर्थातच त्या वेळी तिच्याकडे होता. बिचारी पन्ना ! मनात असून देखील त्या राजपुत्राचे प्राण कसे काय वाचवणार ? ह्या विचारात पडली होती कारण एव्हाना वनवीर तर अगदी जवळ येऊन ठेपला होता. प्रसंग तर मोठा बाका होता. आणि आयत्या वेळी ती बिचारी पन्नादाई करणार तरी काय ? इतक्यात तिला एक कल्पना सुचली. उदयसिंह त्या वेळी झोपलेला होता. त्याला उचलून एका टोपलीत ठेवले. टोपली पालापाचोळ्याने झाकून आचाऱ्याकडे दिली व त्याला सांगितले "ह्याला वीरा नदीवर घेऊन जा व तिथेच माझी वाट बघत उभा राहा." मन अतिशय घट्ट्ट करून व शेवटचा पापा घेऊन राजपुत्र उदयसिंहाच्याच बरोबरीचा असलेल्या, आपल्या स्वतःच्याच पुत्रास तिने त्याच्या जागी निजविले. हे सर्व होत आहे की नाही तोच हातात रक्ताने माखलेली तलवार घेऊन वनवीर ह्या महालात प्रवेश करता झाला.

"कुठे आहे उदयसिंह ?" त्याने पन्नादाईला दरडावून विचारले.

पन्नादाईने काहीही न बोलता त्या पलंगाकडे अंगुलीनिर्देश केला. क्रूरतेने पिसाळलेल्या त्या वनवीराने पलंगाकडे लगेचच झेप घेतली व शांतपणे झोपलेल्या त्या उदयसिंहाचे ? (दासीपुत्र चंदनचे) क्षणार्धात त्याने दोन तुकडे केले व निघून देखील गेला. आपल्या स्वामींच्या रक्षणासाठी पन्नाने आपल्या मुलाचा बळी दिला. आपल्या स्वतःच्या पुत्राचा मृत्यू डोळ्यांसमोर दिसत असताना तिला रडायला देखील फुरसत नव्हती, कारण तिला झटपट व कुणाच्या नकळत नदीकिनारी जायचे होते.

पन्नाने आपल्या मुलाचे मृत शरीर बरोबर घेऊन नदीकिनारा गाठला. त्याचे शरीर तिने नदीत सोडले व राजपुत्र उदयसिंहाला बरोबर घेऊन तिने मेवाडकडे कूच केली. वाटेत तिला बरीच वणवण करावी लागली. खूप हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. अखेर देवराचे राजे 'आकाशाह' यांनी तिला आश्रय

दिला. कालांतराने वनवीराला प्रायश्चित देऊन राजपुत्र उदयसिंह चितोडच्या गादीवर विराजमान झाला.

कर्तव्यनिष्ठेपुढे प्रसंगी आपल्या पोटच्या पुत्राची आहुती देणारी पन्नादाई खरोखरीच किती श्रेष्ठ !

आईबद्दलच्या गोष्टी सांगत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की, एक आईच अशी असते की तिला आपल्या मुलाने स्वत: मोठे व्हावे, आपले स्वतःचे तसेच घराण्याचे नाव मोठे करावे व आपल्या लाडक्याने कुठले ना कुठले क्षेत्र गाजवावे असं वाटत असतं. त्याकरिता ती मुलावर विशेष संस्कार करत असते असे नाही, पण जे काही संस्कार करत असते ते जाणीवपूर्वक करत असते. वेळोवेळी ती आपल्या मुलाला कर्तव्याची जाणीव करून देत असते. आपल्या मुलाला घडवण्यामागे आईचा वाटा किती असतो हे वेगळे सांगावयास नको. कारण हा वाटा इतका सहज व उत्स्फूर्त असतो की, त्याची जाणीव किंवा आपण काहीतरी मुद्दाम करतो आहोत असे आईला देखील वाटत नसते. आईने मुलाला घडवण्याची ही प्रक्रिया थेट गर्भारपणापासून असते. चक्रव्यूह भेद करण्याची ती अभिमन्यूची गोष्ट सर्वांना माहीत आहेच. जसा अभिमन्यू चक्रव्यूह भेद करण्याचे ज्ञान आईच्या पोटात असतानाच शिकला होता, तसेच काहीसे झाले होते बाळ शिवबाच्या बाबतीत !

गेली तीनशे वर्षे चालत आलेले आत्याचार, अंदाधुंदी व आपापसात चालू आसलेल्या लढाया जेव्हा जेव्हा जिजाबाई प्रत्यक्ष डोळ्यांनी बघत, तेव्हा तेव्हा त्यांचे मन विषण्ण होत असे. शिवजन्मापूर्वी जिजाऊमाता अशाच विषण्ण व भयाण मन:स्थितीत असत. त्या वेळच्या त्यांच्या केवळ आठवणीत जरी बादशहाने केलेले अत्याचार आले, तरी त्यांच्या अंगाची लाही लाही होत असे. त्या माऊलीला सदैव तो प्रसंग आठवायचा की ज्या वेळी खास बादशहाच्या देखरेखीखाली तिच्या वडिलांना व तीन भावंडांना मारण्यात आले होते. त्याचा शोक व संताप तिला अनावर होत असे. मस्तकातली आग अधिकाधिक धुमसत असे आणि ह्या सगळ्यांचा परिणाम कळत-नकळत तिच्या उदरात वाढत असलेल्या गर्भावर होत होता. हे होत असतानाच आणखी एक प्रसंगाला तोंड द्यावे लागले. भोसल्यांच्या घरची तरुण स्त्री, गोदावरी नदीवर स्नानासाठी येणार असल्याची माहिती काढून मोगल सरदार महाबतखान याने ती आल्यावर अकस्मात तिच्यावर हल्ला केला. आता तर तिच्या प्रत्यक्ष जावेलाच पळवून नेले होते. त्या माऊलीचा संताप आता तर अधिकच वाढत होता आणि ह्या जुलमाविरुद्ध उठाव करून उठणाऱ्या एका आदर्श राज्यकर्त्यावर

संस्कार होत होते ते अगदी सहजपणे. तिच्या त्या पोटच्या गोळ्यावर व्हायचा तोच परिणाम झाला व जिजाऊच्या उदरी हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवणारा शिवबा जन्माला आला.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवरायांचा अशा वातावरणात जन्म झाला.पण कित्येक वेळा ह्याच्या उलट देखील होते.

गोष्ट आहे उत्तर हिंदुस्थानातील छोट्याशा संस्थानातील. राजमाता विदुला व तिचा पुत्र संजय यांची. बाळपणापासून ऐषआरामात वाढत आलेल्या व मोठेपणी रणांगणातून पळून आलेल्या ह्या संजयची. त्याचे असे झाले, एकदा शत्रूपक्षाबरोबर लढता लढता ह्यां वीराने रणांगणातून काढता पाय घेतला. ह्या पळून आलेल्या आपल्या पुत्राला राणीने अनेक प्रकारे उपदेश करून युद्धावर जाण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण संजय, तो जो रणांगणातून पळून आला होता ते परत रणांगणाला तोंड न दाखवण्याच्या उद्देशानेच. राजकारणात निपुण अशा त्या मातेने मग एक शक्कल लढवली. तिने मुदपाकखान्यात जाऊन आचाऱ्यांना सांगितले, ''उद्या सकाळी झारे, पातेली, कढया इत्यादी सर्व स्वयंपाकाचे सामान एकमेकांवर आपटून आवाज करा. मी एकदा सोडून दोनदा तुम्हाला निरोप पाठवीन. तरी तो गोंगाट तुम्ही तसाच चालू ठेवायचा. शेवटी न ऐकल्याने मी तुम्हाला पकडून आणण्याचा हुकूम करून पकडून घेईन. पकडून आणल्यावर तुम्ही भ्यायल्यासारखे करा व मी जे काही बोलेन ते ऐकून घ्या.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी आचाऱ्यांनी भांड्यांचा आवाज करण्यास सुरुवात केली. राणीने त्यांना आवाज न करण्याबद्दल ठरल्याप्रमाणे निरोप धाडले. गोंगाट कमी न झाल्याने त्यांना पकडून आणण्यात आले. त्यांना समोर उभे करून तिने त्यांना विचारायला सुरुवात केली व म्हणाली,

''हे काय चालवलं आहेत तुम्ही ? रणांगणातील त्या शस्त्रांचा खणखणाट ऐकून भीतीने पळून आलेला माझा मुलगा पलीकडच्या महालात झोपला आहे. ह्या तुमच्या गोंगाटाने तो जर घरातूनही पळून गेला तर मग मला मुलगा कुठला ?

आईची ही वक्रोक्ती ऐकताच संजय मनोमन खजील झाला. खाडकन उठून, ''स्वत:ला भित्रा म्हणवून घेण्यापेक्षा रणांगणावर प्रसंगी मरण आलेले बरे'' असे म्हणत पुन्हा लढण्यास सिद्ध झाला.

असे कधी कळत - नकळत तर कधी जाणूनबुजून केलेल्या संस्काराने मुलगादेखील मग आदर्श बनत जातो. आणि मग तोसुद्धा असत्याविरुद्ध.

अन्यायाविरुद्ध, पापाविरुद्ध लढण्यास सिद्ध होतो. एकीकडे तेवढे त्याचे मन तयार होत जाते.

आपल्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यात अनेक क्रांतिवीर कामास आले. क्रांतिकारक गोपीमोहन हे त्यांपैकीच एक. ह्या क्रांतिकारकाचे संपूर्ण नाव विजय कृष्ण सहा. प्रसंग आहे त्यांच्या मृत्यूच्या वेळचा. अर्थातच त्यांना फाशी देतानाचा. लहानपणापासून त्यांच्यावर त्यांच्या आईकडून होत असलेल्या संस्काराचे शेवटच्या क्षणी त्यांनी दिलेले हे उत्तर !

एक युरोपियन, अर्नेस्ट डे याला मारल्याबद्दल (वास्तविक त्या वेळी त्यांना चार्लस् टे गर्ट नावाच्या पोलिस कमिशनरला मारावयाचे होते) १ मार्च १९२४ रोजी त्यांना फाशी देण्यासाठी फाशी गेटकडे नेण्यात आले. तुरुंगातील रिवाजाप्रमाणे त्यांना त्यांची अंतिम इच्छा विचारण्यात आली. त्या वेळी जेलमधील अधिकाऱ्यांकडे पत्र देत गोपीमोहन उत्तरले.

"माझी शेवटची इच्छा अशी आहे की, हे पत्र माझ्या आईकडे पोहचते करावे."

अधिकाऱ्याने ते पत्र फोडले व त्यातील मजकूर वाचला.

"प्रिय आई,

मी माझे येथील कर्तव्य पूर्ण केल्यावर दुसऱ्या जगतात जात आहे. जगन्नियंत्याला प्रार्थना कर की, प्रत्येक भारतीय मातेने माझ्यासारख्या मुलाला जन्म द्यावा व तुझ्यासारख्या आईकडून प्रत्येक घर पापमुक्त व्हावे.

तुझ्यापासून दूर जाणारा,

तुझा पुत्र<br>
गोपीमोहन."

धन्य ती माता व धन्य तिचा तो पुत्र !

आईसंबंधीच्या अशा एकेक गोष्टी वाचू लागल्यावर मनात प्रश्न उभा राहतो, " आई म्हणजे नेमके आहे तरी काय ? जी आपला स्वत:चा स्वार्थत्याग करून ती आपल्या मुलांसाठी सर्वस्व अर्पण करण्यास तयार असते." आणि मग अशा ह्या आईची तिच्या मुलालासुद्धा प्रकर्षाने आठवण झाली. विशेषत: त्याच्या होत असलेल्या कौतुकाच्या वेळी, तर त्यात आश्चर्य ते कसले ? अशीच आठवण एका मुलाला त्याच्या सत्कारसमारंभाचे वेळी झाली. आणि त्या झालेल्या अतीव आठवणीचे रूपांतर नंतर काव्यात गुंफले आहे हे पाहण्यासारखे आहे.

त्या मुलाचे नाव यशवंत! होय तेच ते कवी यशवंत! त्यांची 'आई'

ही कविता कुणाला माहीत नाही हे संभवत नाही.

"ही कविता तुम्हाला सुचली तरी कशी?" त्यांना एकदा विचारण्यात आले. त्यावर ते सांगतात,

"१९२१ साली नोव्हेंबर महिन्यात मराठी साहित्य संमेलनाचे अधिवेशन बडोदे येथे श्री. न. चिं. केळकर यांचे अध्यक्षतेखाली भरले होते. सर्व उपस्थित कवींनी एक एक कविता म्हणून दाखवावी असे ठरले होते. मी माझी 'देहाचा पूल' कविता म्हटली. अध्यक्षांसहित उपस्थित सर्व रसिकांवर त्या कवितेची एवढी छाप पडली की, मी दुसरी एखादी कविता म्हणावी असे ठरले. तेव्हा मी 'रक्ताचा अर्घ्य' ही माझी दुसरी कविता म्हटली. समारोप प्रसंगी अध्यक्षांनी आवर्जून गौरवपूर्ण निर्देश केला. त्यानंतर प्रसिद्धीच्या पुष्पमाला माझ्या गळ्यात पडू लागल्या. नुकत्याच झालेल्या आईच्या निधनाने (त्यांच्या आईचे निधन १९१८ मध्ये झाले) ह्या अशा प्रसंगी आईची तीव्रतेने आठवण होत होती. वाटायचं 'आई हवी होती अशा वेळी' आणि सततच्या होणाऱ्या या तीव्र आठवणींचा एके दिवशी अचानक बांध फुटला आणि ओठातून सहज उद्गार आले.

'आई करावया तू। नाहीस कौतुकाला।
ह्या न्यूनतेमुळे ही। मज त्याज्य पुष्पमाला॥'
ह्या त्यांच्या आईबद्दलच्या कवितेत कवी पुढे म्हणतात,
आई म्हणोनि कोणी। आईस हाक मारी
ती हांक येई कानी। मज होय शोककारी
नोहेच हाक माते। मारी कुणी कुठारी
आई कुणा म्हणू मी। आई घरी ना दारी
ही न्यूनता सुखाची। चित्ती सदा विदारी
स्वामी तिन्ही जगाचा। आईविना भिकारी।

जसं लहान मुलांना एखादी वस्तू मिळाली नाही तर वाईट वाटतं, पण ती वस्तू जेव्हा त्यांच्या सवंगड्यांनादेखील मिळाली नाही, तर लगेच त्यांला त्यातल्यात्यात बरं वाटतं. तसं कवी इथे आपल्या मनाचं समाधान करून घेत आहे की, एवढ्या मोठ्या विश्वाचा व्याप सांभाळणाऱ्याला सुद्धा जर आई शिवाय राहावे लागते आहे तर मला नसली तर त्यात एवढे वाईट वाटून घेण्यात काय उपयोग.

ह्याच्या उलट आईबद्दलच्या भावना व्यक्त करताना कवी माधव ज्यूलियन म्हणतात,

तुझे पुत्र आम्ही तुझे पांग फेडू।
तुला बैसवू वैभवाचे शिरी॥

मी अगदी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आईबद्दलचे विचार ही एखाद्या भाषेची वा धर्माची इत्यादी मक्तेदारी नाही, तर जगाच्या पाठीवरील यच्चयावत भाषांत तिच्याबद्दल सार्थ, समर्पक असेच उद्‌गार आहेत. ज्यू लोकांच्या भाषेत तर आईबद्दल एक सुंदर म्हण आहे. त्या म्हणीचा अर्थ असा की,

"ईश्वर प्रत्येक ठिकाणी भक्ताची पाठराखण करायला येऊ शकत नाही म्हणून त्याने माता पाठवल्या."

ख़रोखर काय सुंदर कल्पना!

गोष्टी वाचता वाचता आता आईबद्दलची अधिकाधिक माहिती जाणून घेण्यास तुम्हीदेखील उत्सुक झाला आहात ना?

ब्रह्मवैवर्त पुराणातील, गणेश खंडातील ४० व्या अध्यायात एक श्लोक आहे तो येणेप्रमाणे -

जनको जन्मदातृत्वात् पालनाच्च पिता स्मृतः।
गरीयान् जन्मदातुश्च योऽन्नदाता पिता मुने॥
तयोः शतगुणे माता पूज्या मान्याच वन्दीते।
गर्भधारणपोषणाभ्यां सा च द्वाभ्यां गरीयसी॥

जन्मदाता व पालनकर्ता म्हणून सर्व पूज्य गोष्टीत जनक आणि पिता पूज्यतम मानला जातो. जन्मदात्यापेक्षा अन्नदाता पिता श्रेष्ठ आहे व अर्थातच वंदनीय देखील आहे. माता त्याहून शतपटीने श्रेष्ठ आहे कारण ती गर्भधारण सुद्धा करते व गर्भपोषणदेखील करते.

'मात्रासमं नास्ति शरीरपोषणम्।'

आईप्रमाणे शरीराचे पोषण करणारे कोणी नाही.

आईचे आपल्या मुलावर किती प्रेम असावे?

एक प्रियकर आपल्या प्रेयसीवर निरातिशय प्रेम करायचा. प्रेयसीला मात्र ते तितकेसे आवडत नसावे. हा जेव्हा जेव्हा तिला लग्नाबद्दल विचारीत असे तेव्हा तेव्हा ती त्याला उडवाउडवीची उत्तरे देत असे. एकदा असेच नेहमीप्रमाणे त्याने लग्नासंबंधी विचारले. तिने एक अशक्यप्राय अशी गोष्ट त्याला करावयाला सांगितली. तिने त्याला सांगितले, "तू जर खरोखरच माझ्यावर प्रेम करत असशील तर तुझ्या आईचे काळीज मला घेऊन ये." तिने सरळ सरळ नकार द्यावयाच्या ऐवजी अशा तऱ्हेने अशक्यप्राय गोष्ट करण्यास सांगून नकार दिला. पण प्रेमाने वेडा झालेल्या ह्याला ते कळले नाही. तो धावत आपल्या

आईकडे आला, तिचे काळीज घेण्यासाठी. काहीही न बोलता अतिशय कृतघ्नपणे, निर्दयपणे आपल्या आईला ठार मारून तिचे काळीज काढून घेतले व पुन्हा पळत सुटला आपल्या प्रेयसीकडे. आता तो आनंदाने वेडापिसा झाला होता, कारण प्रेयसीने मागितलेली गोष्ट आणून दिल्याने प्रेयसी आता त्याच्याशी लग्न करणार होती. कारण तसे त्यांचे ठरलेच होते मुळी. आणि तिला तो भेटायला आतुर झाल्याने अधिकच वेगात पळत होता आणि इतक्यात पळता पळता तो जमिनीवर पडला. तो पडला तशी त्याच्या हातातील त्या आईच्या काळजातून उद्‌गार आले,

"अरे, बाळ पडलास! तुला कुठे लागलं बिगलं तर नाही ना?"

काय त्या मातेचे आपल्या मुलावर असलेले प्रेम आणि कुठे तो त्या मुलाचा निर्दयीपणा!

पुढे ते बाळ? पुन्हा उठून धावत आपल्या प्रेयसीकडे पोहोचले. अतिशय अधीरतेने त्याने तिला आपल्या हातातील काळीज दिले. ते पाहून ती उद्‌गारली,

"अरे, कृतघ्ना, माझ्यासारख्या प्रेयसीसाठी तू तुझ्या प्राणाहून प्रिय अशा आईला ठार मारलेस. उद्या माझ्यापेक्षा सुंदर मुलगी मिळाल्यावर तिच्या सांगण्यावरून तू मलादेखील ठार मारण्याला कमी करणार नाहीस. जो आपल्या पालनकर्त्या पोषणकर्त्या आईलादेखील मारण्यास धजावतो, त्याच्याशी अशा निष्ठुर हृदय असलेल्या माणसाशी मी लग्न करणार नाही." असे म्हणून ती चालती झाली.

अर्थात ही एक काल्पनिक गोष्ट आहे. पण आता जी गोष्ट सांगणार आहे ती एका माहात्म्याची. ज्याचे आपल्या आईवर व आईचे देखील त्या पुत्रावर निरतिशय प्रेम होते. अर्थात ही एक सत्य घटना आहे. घटना आहे, ते जेलमध्ये होते त्या वेळची. जेलमध्ये असताना एके दिवशी नेहमीप्रमाणे महात्मा त्यांच्याजवळ आले, त्या वेळी ह्या त्यांच्या शिष्यांच्या मनात नेहमीप्रमाणे शांती तर दिसली नाहीच पण एक प्रकारच्या भीतीने त्यांना ग्रासल्याचे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा त्यांनी त्याला विचारले,

"बेटा, तू आज एवढा चिंतामग्न का दिसत आहेस? उपनिषद शिकूनसुद्धा ज्याला शांती मिळत नाही, त्याला संसारात कुठेच शांती नाही."

"गुरुवर, आपले म्हणणे खरे आहे." अत्यंत नम्रपणे शिष्य म्हणाला व पुढे तो सांगू लागला, "काल मला रात्रभर एकाच स्वप्नाने बेचैन केले. रात्रभर झोप तर नाहीच पण त्या स्वप्नातील भयानकताही जात नाही."

"असे काय होते त्या स्वप्नात?"... महात्मा.

“स्वप्नात दिसले की मी एका कच्च्या घरात, (मातीच्या झोपडीवजा असलेल्या) माझी आई केस मोकळे सोडून बसली आहे. तेवढ्यात मी हातात तलवार घेऊन आत येतो व मोकळे सोडलेले आईचे केस धरून तिला घराबाहेर काढतो. असे करत असताना आई ओरडत होती, तरी मी तिच्या त्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करतो व अखेर माझ्या हातातील तलवारीने तिचा वध करतो.”

ही हकीगत सांगत असताना तो गुरूंना पुढे विचारता झाला की, “माझे माझ्या आईवर निरतिशय प्रेम असताना ही अशक्यप्राय अशी गोष्ट स्वप्नात तरी का दिसावी? आणि हे एकच स्वप्न मला फिरून फिरून का दिसावे? ह्याचे उत्तर न मिळाल्याने मी उदास आहे.”

महात्म्याने काही काळ विचार केला व विचारले, “काल स्वयंपाक कोणी केला? काही पदार्थ बाहेरून मागवले होते काय?”

“नाही गुरुदेव! पण कालचे जेवण रोजच्यापेक्षा वेगळे व रुचकर होते खरे.”

महात्म्याने अधिक काही न बोलता बंदीगृहाच्या अधिकाऱ्याकडे जाऊन विचारले,

“काल कुणी नव्या बंदीवानाने स्वयंपाक केला होता काय?”

“होय!” अधिकारी उत्तरला.

नंतर त्या नवीन स्वयंपाक्याची माहिती मागवण्यात आली. तो बंदिवान एका खेडेगावातील लहानशा झोपडीत राहात होता. आईचा खून केल्याबद्दल त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली होती. त्याने केलेल्या खुनाच्या वेळची परिस्थिती व एकंदरीत वर्णन हे काल पडलेल्या स्वप्नातील परिस्थितीशी जुळणारे होते. नंतर पुन्हा तो स्वयंपाकी जेव्हा बदलण्यात आला तेव्हा असले स्वप्न दिसणे बंद झाले.

ही गोष्ट काल्पनिक वा पौराणिक नाही तर एक सत्य घटना आहे. महात्मा आनंदस्वामी जेलमध्ये श्री. रणवीर यांना शिकवायला जात, जे आज दै. मिलापचे संपादक आहेत आणि ही गोष्ट त्यांनी ऐनिषद सार मधेही प्रसिद्ध केली आहे.

अशीच एक ऐतिहासिक सत्य घटना. इ. स. सातव्या शतकात गुजराथमध्ये जयशिखर नावाचा राजा राज्य करीत होता. हा राजा प्रजाहितदक्ष होता. त्याच्या राज्यात सुखसमृद्धीची रेलचेल होती. चारही दिशांना राजाची कीर्ती पसरली होती. ह्या राजाच्या राणीचे नाव होते रूपसुंदरी. ती नावाप्रमाणेच सुंदर देखील होती. राजाच्या कीर्तीबरोबर राणीच्या सौंदर्याची ख्यातीसुद्धा

चहुदिशांना पसरली होती. तेथून जवळच असलेल्या भुवड राज्याच्या राजाच्या मनात ही राणी भरली होती. शिवाय त्याच्या मनात गुजराथच्या समृद्ध राज्यान्चा लोभ देखील होताच. तो आपली प्रचंड सेना घेऊन ह्या राज्यावर चाल करून आला. स्वत: राजा जयशिखर व त्याची सेना प्राणपणाने लढली. पण एवढ्या अफाट सैन्यापुढे त्याचा टिकाव लागला नाही. राजा जयशिखरचा पराभव झाला व त्या युद्धातच तो कामी आला. त्या वेळी राणी रूपवती गर्भवती होती. ती आपल्या भावाबरोबर वनात पळून गेली. नंतर तिने भावाला परत पाठवून दिले. स्वत: एका भिल्लीणीच्या आश्रयाला राहिली. कालांतराने तिला एक पुत्र झाला. त्याचे नाव वनराज. राणीने व त्या भिल्लीणीने वनराजावर वीरोचित असे संस्कार केले. कालांतराने एका संन्याशाच्या आग्रहावरून राणी व वनराज त्याच्या आश्रमात राहण्यास गेले. तेथे वनराजाला शस्त्रास्त्र विद्येचे सर्व शिक्षण देण्यात आले. कालांतराने वनराजाने भिल्लांच्या मदतीने भुवड राजाचा पराभव केला व त्याने बळकावलेला गुजराथचा भूभाग परत मिळवला. यात आईच्या मनातील पराभवाचा घ्यावयाचा सूड व त्याकरिता त्याच्यावर तिने केलेले संस्कार दिसून येतात. आणि त्याचबरोबर प्रसंगी भिल्लीणीबरोबर राहून मुलाला मोठे करणाऱ्या राणी रूपवतीमध्ये आदर्श मातेचे रूप पाहावयास मिळते.

काश्यप ऋषींच्या दोन भार्या. एक कद्रु व दुसरी विनता. ह्या दोघींमध्ये एकदा पैज लागली की सूर्यनारायणाचा घोडा काळा आहे की पांढरा. विनता म्हणे हा घोडा पांढरा शुभ्र वर्णाचा आहे व कद्रुने वाद घातला की घोडा पांढरा असला तरी त्याची शेपूट काळी आहे. झालं, दोघींची पैज लागली. जी कोणी हरेल तिने दुसरीचं दास्यत्व स्वीकारायचं. इकडे कद्रुने पैज जिंकण्यासाठी आपल्या मुलांना - सर्पांना - सांगितले, "उद्या सकाळच्या आत तुम्ही उच्चैश्रवाच्या शेपटीस विळखा घालायचा म्हणजे त्याची शेपूट काळी दिसेल."

खरं म्हणजे, आपल्या आईची ही वृत्ती तिच्या काही मुलांना आवडली नाही, पण काहींनी मात्र भीतीपोटी तसं करण्याचं मान्य केलं. ठरल्याप्रमाणे हे सर्वजण घोडा पाहावयास गेले. त्या वेळी त्याची शेपटी काळी दिसल्याने विनताने आपली हार मान्य केली व अशा तऱ्हेने तिला कद्रुचे दास्यत्व स्वीकारावे लागले. ह्याच वेळी विनता गरोदर होती. पुढे काही दिवसांनी तिने दोन अंड्यांना जन्म दिला. आता कित्येक दिवस आपल्याला खितपत राहावे लागणार असल्याने तिला वाईट वाटले. काही दिवसांनी तिने त्यातले एक अंडे फोडले. त्यातून पुत्र झाला, पण दुर्दैवाने पांगळा. कारण पूर्ण वाढ

होण्याआधीच त्याचे कवच फोडण्यात आले होते. असा हा पांगळा पुत्र तिला म्हणाला, "माते, हे काय केलेस? माझी पूर्ण वाढ होण्याआधीच तू कवच फोडलेस, पण आता दुसरे अंडे तरी इतक्यात फोडू नकोस. त्यातील माझा भाऊ पराक्रमी असेल व तो आपल्याला दास्यत्वातून मुक्त करेल." तसे पाहता अरुणदेखील पांगळा असला तरी ज्ञानी होता. त्याने सूर्याच्या रथाचा सारथी होण्याचे ठरवले. यथावकाश दुसऱ्या अंड्यातून गरुडाचा जन्म झाला. विनतेला आनंद झाला कारण कद्रुने तिला मुक्ततेचा मार्ग सांगितला होता, "जर माझ्या मुलांना अमृत पाजशील तर मी तुला मुक्त करीन."

गरुडाच्या जन्माने आता तिला हे शक्य झाले होते. गरुड अमृत आणण्यासाठी स्वर्गात-जाण्यास निघाला. वाटेत त्याला अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले. पण ह्या इतक्या सर्व अडचणीतून त्याने तो अमृतकुंभ कद्रुच्या मुलांपुढे, सापांपुढे आणून ठेवला. विनता दास्यातून मुक्त झाली. आपली आई दास्यातून मुक्त होताक्षणी गरुडाने तो अमृतकुंभ पुन्हा स्वर्गात नेऊन ठेवला. कारण हे अमृत पिऊन सर्प अमर झाले तर त्यांचा पृथ्वीला त्रास होईल, म्हणून देवांनीच ही युक्ती सांगितली होती.

अशा ह्या गरुडाची माता जी जिद्दी, सोशीक तरीही आशावादी होती. ती आजही साऱ्या जगतात अमर आहे, ते एका पराक्रमी पुत्राची आई म्हणून.

ही गोष्ट आहे अगदी अलीकडील म्हणजे पेशवाई काळातील. निजाम सर्वत्र धुमाकूळ घालत होता, देवळे फोडत होता, त्याची लूटालूट चालली होती, मंदिरे उद्ध्वस्त करून त्यावरील सुवर्णाचे कळस घेऊन जात होता. ह्या अशा चिंताजनक बातम्यांनी राघोबादादा व माधवराव चिंतातूर झाले होते. अशातच साऱ्या सरदारांना हुकूम सोडण्यात आले, "फौजा तयार ठेवा, व श्रीमंतांच्या छावणीत येऊन ताबडतोब दाखल व्हा."

सर्व सरदारांप्रमाणेच त्यातील एक हुकूम सरदार ढमढेऱ्यांकडे देखील गेला. ढमढेऱ्यांचे घर हे जरी सरदाराचे असले तरी घरातील सर्वच्या सर्व पुरुषमंडळी ह्यापूर्वीच म्हणजे पानीपतच्या लढाईत कामी आली होती. आता त्या घरातील मंडळी म्हणजे सर्व विधवा बायका व एक दहा वर्षांचे पोर - जयसिंगराव त्याचे नाव!

तो खलिता वाचून दाखवणारे मुजूमदार खलिता वाचून झाल्यावर वहिनीसाहेबांना म्हणाले, "कदाचित इकडे खलिता चुकून पाठविण्यात आला असेल!"

हे ऐकल्यावर त्या जिद्दी, शूर, हुशार व धीट आईने आपल्या मुलास -

जयसिंगास बोलावून घेतले व विचारले, “युद्धासाठी तयार राहण्यासंबंधी श्रीमंतांचा खलिता आला आहे. जाशील ना तू युद्धावर?”

इकडे मुजूमदारांनी वहिनीसाहेबांचे मन वळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण आधीच निश्चय केलेल्या वहिनीसाहेबांनी आपल्या निर्णयात बदल करण्याचा जराही विचार केला नाही. घराण्याच्या इभ्रतीसाठी, पेशव्यांच्या गादीसाठी व कर्तव्य ह्या नात्याने लहानग्या जयसिंगास श्रीमंतांच्या छावणीत जाण्यास सांगितले व स्वत: जातीने त्यांना छावणीत पोहोचवले.

“हा कोवळा पोर आहे, ह्याला परत न्या.” अशा तऱ्हेने श्रीमंतांनीदेखील त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण मर्दुमकीची जिद्द होती. वास्तविक युद्धामध्ये ह्या घरातील सर्वचजण कामाला आली होती. पण निश्चयी, जिद्दी व कर्तव्याची जाण असलेल्या त्या बाईंनी त्याला तिथेच ठेवण्यास सांगितले. अखेर त्या आईची जिद्द पाहून राघोबादादांनी त्याला ठेवून घेण्याचे मान्य केले. त्या लहानग्या जयसिंगाला आपल्याच अंबारीत बसवले. प्रत्यक्ष रणभूमीवर निजामाच्या त्या सैन्यापुढे पेशव्यांचा काही पाडाव लागेना. निजामाच्या सैन्याने स्वत: पेशव्यांच्या जरीपटक्याला हात घातला व आता ते निशाण हिसकावणार असे दिसताच, ह्या चिमुकल्या जंयसिंगाने “हर हर महादेव”, अशी घोषणा करीत अंबारीतून उडी ठोकली व सपासप तलवार चालवत असल्याचे राघोबादादांनी पाहिले. पुढच्याच क्षणी गनिमाच्या एका तलवारीने घात केलेला त्यांना स्वत:च्या डोळ्यांनी पाहावे लागले. त्या छोट्याशा मुलाने देशासाठी, पेशव्यांसाठी, घराण्यासाठी बलिदान दिले होते. त्यानंतर माधवरावांची कुमक आली व मोठ्या लढाईने पेशव्यांचा जय झाला. विजय पताका घेऊन सैन्य पुण्यास आले. आपल्या अंकुराचा पराक्रम पाहण्यासाठी स्वत: वहिनीसाहेब देखील पुढे आल्या. दुर्दैवाने राघोबादादांना पुढे आलेल्या वहिनीसाहेबांना ही दुर्दैवी बातमी द्यावी लागली. स्वाभाविकत: त्या मातेच्या डोळ्यांत पाणी आले. पण दुसऱ्याच क्षणी त्या मातेने आपले डोळे पुसले व त्याने केलेल्या पराक्रमाचे वर्णन करण्यास राघोबादादांना सांगितले. राघोबादादांनी त्याने केलेल्या पराक्रमाचे वर्णन केले. तेव्हा त्या उद्गारल्या,

“श्रीमंत, तुम्ही मुळीच कष्टी होऊ नका. माझा कुळधर्म साजरा झाला. काय म्हणता, माझ्या लहानग्याने अशी उडी घेतली? छान! छान! धन्य केलीस तू माझी कूस! शाब्बास माझ्या लेकरा. सार्थक केलंस तू, माझ्या जन्माचं!”

वास्तविक पाहता प्रत्येक आई आपल्या मुलाच्या दृष्टीने आदर्श असते.

आणि आपला मुलगा हा आईला प्रिय असतो. मग तो मुलगा कसाही असो. साधारणपणे आई - वडील चांगले असतील, संस्कारक्षम असतील, तर त्यांची मुलंसुद्धा चांगल्या आचार - विचारांची असतात. ह्या बाबतीत तुकाराम महाराजांचे शब्द फार बोलके आहेत,

"शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी"

पेरताना जर चांगले उत्कृष्ट दर्जाचे बी पेरले तर त्यापासून तयार होणारे झाड व त्या झाडाला येणारी फळे ही उत्तम प्रतीचीच असणार. जसे पेरावे तसेच उगवते.

पण तरी आपल्या दैनंदिन जीवनात चांगल्या आई - वडिलांची मुले वाईट असलेली बघावी लागतात. म्हणजे कित्येक वेळा असं घडतं की आई - वडील आदर्श असले तरी त्यांना होणारी मुले आदर्श असतीलच असे नाही. मग असं का व्हावं? तर लक्षात असं येतं की त्याला अन्य देखील कारणं असू शकतात. एखाद्या आदर्श आई - वडिलांच्या पोटी आदर्श असा मुलगा व्हावा हीच सर्वसामान्यपणे इच्छा असते.

शिवाजी महाराजांपेक्षा काकणभर सरसच असा संभाजी पण त्याच्या अंगी असलेली बेपर्वा वृत्ती वा कालांतराने त्याला लागलेली व्यसने, त्याच्या अंगी असलेला बेडरपणा इत्यादी प्रकार पाहिल्यावर, मनात येतं असं का व्हावं ?

शिवाजी महाराज जावळीच्या मोऱ्यांचा सूड घेण्याच्या मनोवृत्तीत असताना संभाजी महाराजांच्या गर्भाची धारणा सईबाईंच्या उदरात झाली असावी. ते हिंसक प्रवृत्तीचे संस्कार गर्भावर झाल्याचा परिणाम संभाजी महाराजांच्या जीवनावर झाला असावा. अलीकडच्या काळातही महात्मा गांधींनी असे विचार प्रकट केले होते. कस्तुरबा आजारी असताना त्यांचा मुलगा त्यांना भेटायला आला होता. त्या वेळी त्याच्या तोंडाला दारूचा वास येत होता. व्यथित अंतःकरणाने बा, बापूंना म्हणाल्या,

"आपण एवढे सत्प्रवृत्तीचे असताना हा असा का झाला असावा ?"

त्यावर बापूजी उत्तरले,

"बा, ह्याच्या जन्माच्यावेळी मी कसा होतो माहीत आहे ना तुला ? तेच संस्कार त्या गर्भावर झाले."

अशा ह्या आईचे वर्णन करताना सुप्रसिद्ध लेखक आचार्य अत्रे म्हणतात, "आई असेपर्यंत तिची किंमत वाटत नाही व ती गेल्यावर मात्र जगात कशाचीच किंमत वाटत नाही. तर आईसंबंधी आपले विचार मांडताना गीताईकार विनोबा भावे म्हणतात,

"अगदी पहिल्या प्रथम परमेश्वराची मूर्ती म्हणजे आई आपल्या जवळ आहे. श्रुती म्हणते 'मातृदेवो भव'. जन्मत:च मुलाला आईशिवाय काय दिसतं? वात्सल्याच्या रूपाने ती परमेश्वराची मूर्तीच तेथे उभी असते. अगदी आरंभी उंचच उंच परमेश्वराची प्रतिमा जी मुलासमोर उभी राहते ती मातेची. केवळ आईची सेवा केल्याने, तिची पूजा केल्याने मोक्ष मिळणे अशक्य नाही. आईची पूजा म्हणजे वत्सलतेने समोर उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा! आई निमित्तमात्र आहे. परमेश्वरच तिच्या ठिकाणी आपली वत्सलता ठेवून तिला नाचवितो. तिला बिचारीला कळत नाही की, का आतून एवढी माया वाटते. मुलाने म्हातारपणी आपल्या उपयोगी पडावे म्हणून का ती त्याची सेवा करत असते? छे छे बाळाला जन्म देताना झालेल्या वेदना तिला बाळाचे वेड लावतात. त्या वेदना तिला वत्सल करतात. तिला प्रेम केल्याशिवाय राहवतच नाही. ती माऊली म्हणजे 'वत्सलतेची मूर्ती.'

आपले मूल मोठे व्हावे, मोठे होत असताना ते नावारूपाला यावे, लोकोपयोगी पडावे व त्याने काहीतरी बनून दाखवावे, अशी प्रत्येक आईची इच्छा असते. पण प्रत्यक्षात तसे घडतेच असे नाही. थोरांची आई व आपल्या सर्वांची आई ही काही वेगळी असत नाही. जसे त्यांची आई त्यांच्यावर प्रेम करते तसेच आपली आई आपल्यावर प्रेम करीत असते. आपल्याही जीवनात असे काही हृदयद्रावक आणि संस्मरणीय प्रसंग असतात. पण दुर्दैवाने ते आपण शब्दबद्ध करू शकत नाही. असेच काही थोरामोठ्यांनी आपल्या आईविषयीचे मांडलेले विचार देत आहे.

कविवर्य यशवंत म्हणजे आई ही त्यांची कविता व आईची आठवण म्हणजे कविवर्य यशवंत असे एक सार्थ, समीकरण झाले आहे ते त्यांच्या 'आई' ह्या कवितेमुळे. त्या कवितेतील काही ओळी आपण मागेच पाहिल्या.
मराठी भाषेतील आणखी एक कवी 'माधव ज्यूलियन' त्यांच्या 'आईची आठवण' ह्या कवितेत म्हणतात -

'प्रेमस्वरूप आई वात्सल्य सिंधू आई'

ह्या कवितेत कवी तिचे वर्णन करतात आणि आठवतात की तिच्या वियोगाने त्यांना सारे ब्रह्मांड कसे आठवते ते, हे सर्व आठवत असताना ते देवाजवळ आशा व्यक्त करतात.

"घे जन्म तू फिरूनी, येईन मी ही पोटी
खोटी ठरो न देवा, ही एक आस मोठी"

'आई' हा विषयच किती स्फूर्तीदायक आहे. तिजबद्दल सहज उद्गार

निघावेत आणि त्या उद्गारांचं लिखाणात रूपांतर झालेलं कुणाच्या वाचनात आलं, त्यानं उत्स्फूर्तपणे व सहज म्हणून जावं 'काय सुंदर काव्य आहे!'

आई हा विषयच असा आहे. असं असलं तरी दुर्दैवाने आपल्याला फक्त माहीत आहेत ते कवी यशवंत व कवी माधव ज्यूलियन. पण ह्यांच्याशिवाय आणखी कितीतरी कवींनी आईविषयी आपले विचार काव्यात गुंफले आहेत. त्यापैकीच काही नावे.

बा.भ. बोरकरांची - 'ते कर मन्मातेचे.'
अनंत काणेकरांची - 'जेव्हा चिंतित.'
कविवर्य संजीवनी ह्यांचे - 'माझे धन्य आईपण.'
राम शेवाळकरांची - 'बदल.'
राजा मंगळवेढेकरांची - 'दोन अक्षरे.'
योगेश्वर अभ्यंकरांची - 'आई.'
सूर्यकांत खांडेकरांची - 'माझे वंदन तुज आई.'
माधव गोविंद काटकरांची - 'मातृदेवो भव.'
कल्याण इनामदारांची - 'आई.'
गंगाधर महांबऱ्यांची - 'आई.'
आ.ता. पेडणेकरांची - 'मंत्र जपावा आई.'
लक्ष्मीबाई पटवर्धनांची - 'माऊली.'

अशा एक ना दोन असंख्य कवींना सहज स्फुरावा व शब्द सहज सुचावेत असाच हा विषय आहे मुळी. काव्यातील प्रत्येक ओळीत व ओळीतला प्रत्येक शब्द भावनांनी ओथंबलेला असतो. त्यात व्यक्त झालेली दिसते ती कृतज्ञतेची भावना. आणि आईबद्दल वाटत असलेली आपुलकी, जिव्हाळा, माया, प्रेम एकामागोमाग एक वाचावयास गेले की सहजपणे आपल्या नकळत आपले डोळे पाणावतात. आणि नकळतपणे आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते ती आपली आई!

त्यात कुणी म्हणतं की, "तू एवढी महान आहेस की तुझं प्रेम स्वीकारायला सुद्धा मी नालायक आहे." असे कुणी नकारात्मक सूर काढतात, तर कुणी म्हणतं, "तुझ्या त्या प्रचंड त्यागापुढे मी कृतघ्न आहे, किती स्वार्थी आहे, तू केलेले उपकार मी जन्मोजन्मी तुझ्या पोटी येऊन फेडण्याचे प्रयत्न केले तरी फेडू शकणार नाही. तर कुणाला होणाऱ्या त्या आईच्या आठवणी आजही ताज्या वाटतात. आणि म्हणतात, 'नुसत्या आठवणींनी सुद्धा किती भरून येतं.' कवी योगेश्वर त्यांच्या कवितेत म्हणतात, "देवा मला तू मुक्ती दिली

नाहीस तरी चालेल पण माझ्यावर असलेलं मायेचं पांघरूण काढू नकोस. ती आमरण असू दे. तर कवी काटकर 'आई' ही वत्सलतेची, त्यागाची, मांगल्याची मूर्ती कशी आहे ते सांगतात.

हे झालं 'आई' वरील काव्याचं! पण प्रत्येकजण आपले विचार काव्यात गुंफू शकतोच असं नाही. काही जणांच्या गद्यातील आठवणी देत आहे.

सुप्रसिद्ध लेखिका इंदुमती शेवडे आपल्या आईविषयी आठवणी सांगताना म्हणतात,

''लहानपणी खाण्या - पिण्याच्या बाबतीत माझ्या खूप आवडीनिवडी होत्या. हे नको, ते आवडत नाही. असाच पाढा! बहुतेक भाज्या, चटण्या, उसळी माझ्या जेवणातून बाद झाल्या होत्या. त्यावरून एकदा आई म्हणाली,

'तू अन्नाशी फार भांडतेस.''

''म्हणजे काय गं आई?''

''अगं, अशा आवडीनिवडी म्हणजे भांडणच नाही का?''

''पण आवडत नाही त्याला काय करायचं?''

''आवडून घ्यायला शिकायचं.''

''का पण?''

''कारण अशा आवडीनिवडी म्हणजे प्रत्यक्ष देवाच्याच सृष्टीशी भांडण असतं म्हणून देवानं निर्माण केलेल्या सर्व वस्तू चांगल्या असतात. जे वाट्याला येईल ते आवडून घ्यायचं. अन् बरं का, जसं वस्तूंचं तसंच माणसांचं.... जी वाट्याला येतील ती आवडून घ्यायची!''

संस्कार, संस्कार म्हणतात ते हेच. आई आपल्या मुलांवर किती सहजपणे संस्कार करत असते. नाही का? आपल्या सख्ख्या नातेवाइकांबद्दल त्या काय म्हणतात हे खालील प्रसंगावरून बरेच बोलके वाटावे.

त्या सांगतात....

''स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतल्याबद्दल माझ्या वडिलांना ४१ साली तुरुंगवास भोगावा लागला. ते ४५ सालापर्यंत तुरुंगात होते, तेव्हा ते वकिली करत असत. पण वकिली सोडल्यानंतर उत्पन्नाचं साधन म्हणून त्यांनी एक छोटासा छापखाना काढला. वडील तुरुंगात गेल्यानंतर त्यातील नोकरांनी आमच्या नातेवाइकांच्या मदतीने पैशाची अफरातफर करून ठेवली व आईला खोटे हिशेब दाखवून गेले. वडील सुटून आल्यावर त्यांच्या एका मित्राने अफरातफरीबद्दल नातेवाइकांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत सुचवले. त्यावर आई म्हणाली,

''घरातल्या गोष्टी मी घराच्या उंबरठ्याबाहेर पडू देणार नाही.''

"पण कितीतरी रकमांचे हिशेब मांडलेलेच नाहीत, वहिनी.' इति काका.

त्यावर आईचे उत्तर होते,

"रक्ताच्या माणसांचा सगळा वेगळाच हिशेब असतो. भावजी त्याला व्यवहारातलं गणित उपयोगाचं नाही. पैसे गेले ते आमच्या नशिबात नव्हते असं म्हणून मी स्वस्थ बसेन पण सख्ख्या नातेवाइकांविरुद्ध कोर्टाची पायरी चढणार नाही."

आईबद्दल आठवणी सांगताना त्या आणखी पुढे सांगतात,

"मी मॅट्रिक नंतर एम.ए.पर्यंतच्या सर्व परीक्षा, माझी मुलं आईकडे ठेवून दिल्या. व आईनेही ती आनंदाने सांभाळली व मला परीक्षांना वेळ दिला. पुढे एम.ए.च्या परीक्षेला केवळ १॥ महिना उरला असताना वडील वारले, आता कसली परीक्षा अन् कसले काय! कारण त्यांच्या आजारपणातही माझे बरेच दिवस गेले होते. आता पुढच्या वर्षीच प्रयत्न करावयाचा असे म्हणून मी आईच्या सोबतीला राहावयाचे ठरवले. त्यावर ती म्हणाली,

"सांसारिक अडचणीपायी मला विद्या मिळविता आली नाही. तू इतक्या अडचणीतून वाट काढून परीक्षेची तयारी केलीस, तेव्हा तू आता थोडक्याकरिता परीक्षा बुडवू नकोस. तू माझ्याजवळ थांबली नाहीस तरी मला वाईट वाटणार नाही. तू जा, आणि अभ्यासाला लाग!"

मी परीक्षेला बसले व पास झाले. मला नेहमी वाटतं की माझी एम्.ए.ची पदवी म्हणजे आईची देणगी!"

त्यांच्या आईच्या आठवणी सांगताना त्या शेवटी सांगतात,

"वडिलांच्या निधनापाठोपाठ माझा कर्तासवरता भाऊ गेला. जणू आईच्या मनोधैर्याची परीक्षाच घ्यायचे ठरले असावे. आम्हाला आईची काळजी वाटायची. तिने तिचे दुःख कोणाला दिसू दिले नाही. रात्री मात्र तिच्या डोळ्यांत संतत धारा लागत. ह्या दुःखात आई खचली असावी व तिला तो शेवटचा आजार जडला. गेले २ ते २॥ महिने तिचे वारंवार पोट दुखत असे. पण तिने ते दुखणे अंगावर काढले. त्या वेळी ती सुनेच्या बाळंतपणासाठी म्हणून माझ्या दोन नंबरच्या भावाकडे राहिली होती. बाळंतिणीची उस्तवारी, दोन्ही वेळचा स्वयंपाक, मुलांचे करणे आणि त्यातच गावात चालू असलेल्या विद्वान शास्त्रीबोवांची होणारी सकाळ - संध्याकाळची गीता प्रवचने. रात्रीच्या प्रवचनानंतर तिला निजायला मध्यरात्र होई. अशाने पोट दुखणे वाढतच गेले. शेवटी असह्य झाल्यावर भावाला कळले. तिच्या पोटदुखीची परीक्षा करवली असता पोटाचा कॅन्सर असल्याचे लक्षात आले. लगेचच ऑपरेशन केले असता

वाचण्याची अंधुकशी शक्यता होती. हो नाही करता करता मोठ्या मुश्किलीने ती ऑपरेशनला तयार झाली. ऑपरेशनच्या आदल्या रात्री तिला झोप लागली नाही. आम्ही सर्वजण तिच्या बाजूलाच बसलो होतो. तेव्हा ती म्हणाली,

"उद्या माझे काय होणार आहे कोणास ठाऊक! कधी कधी वाटतं मी तुमचं काहीच करू शकले नाही. सगळं आयुष्य कसं धावपळीत निघून गेलं. आणि विशेष म्हणजे आम्ही तुमच्यासाठी काहीच ठेवू शकलो नाही, याचंच वैषम्य वाटतं."

अन् बोलता बोलता शब्द तिच्या घशात अडकले व दुःखामुळे आमच्याही तोंडून शब्द फुटले नाहीत.

दुसरे दिवशी ऑपरेशन झाले व त्यातच ती गेली."

जीवनभर मुलांसाठी व पतीसाठी झटणाऱ्या, त्या मातेचे वर्णन इंदुमतीबाईंनी किती यथार्थपणे केले आहे नाही?

आईचं वर्णन करताना योगिनी जोगळेकर म्हणतात,

"चंद्र सूर्याचा ताजवा करून पृथ्वीचे नाणे एका पारड्यात टाकले तरीही जिची तुला होऊ शकणार नाही, अशी ही अतुला म्हणजेच माता!"

त्यांना आईबद्दलची एखादी आठवण सांगण्यास सांगितले असता, त्या त्यांच्याच शब्दात विचारतात,

"प्राजक्ताच्या झाडाखाली पहाटे फुलांचा केवढा सडा पडतो, सगळीच सतेज, सगळीच सुगंधी, त्यातले निवडायचे तरी कुठले? वाटते कुठलेच निवडू नये. सगळ्यांकडे नुसते पाहत राहावे. आईच्या आठवणीसंबंधी निवड करताना नेमकी मनाची अशीच स्थिती होते."

त्या पुढे सांगतात,

"आई पदवीधर नव्हती पण अनुभव इतके दांडगे असत. ती सांगे 'कुठलीही गोष्ट करताना - मुकी बिचारी जनावरं कुणीही हाकावी - अशा भावनेने न करता मनाला व बुद्धीला पटेल तेच करा. मी तिला अधून मधून छेडायची खरी! आईला छेडणे बरे नव्हे, पण मला त्या वेळी इतकी पोच कुठे होती?

'जेवायला बसण्यापूर्वी पानाला पाण्याने नैवेद्य का दाखवायचा?'

एकदा तिला मी नेहमीप्रमाणे छेडले.

"आपस्तंभ करण्यासाठी" आई म्हणाली.

"म्हणजे काय?" मी.

'संस्कृत शिकतेस ना' मला एक रेशमी चिमटा बसला व लगेच पुढे उत्तर आले, आप म्हणजे पाणी व स्तंभ म्हणजे खांब. खाद्यपदार्थांच्या वासामुळे

मुंग्या, मुंगळे येऊ नयेत म्हणून पाण्याचे खांब पानाभोवती करायचे व तरीही त्यांना अतृप्त ठेवायचे नाही म्हणून चित्राहुती घालायच्या. काकबळी व गोग्रास सुद्धा भूतदयेचे धडे देण्यासाठीच असतात.

दोनतीन दिवसानंतरचा प्रसंग. त्या दिवशी आमच्याकडे कसले तरी देव - ब्राह्मण होते. माझ्या मोठ्या भावाची (आण्णाची) त्या दिवशी सकाळीच कुठेशी संघाची बैठक होती. संघ जातीभेद मानीत नसल्याने त्याचे अनेक जातीचे मित्र होते. त्या सर्वांना थेट घरापर्यंत आणण्याचा पायंडा. त्या दिवशी बैठक दुपारी १२ वाजता संपल्यावर तो त्याच्या एका मित्राला घेऊन आला व आईला म्हणाला, "आई, आज मी माझ्याबरोबर मित्राला जेवायला आणलं आहे हं !"

आई म्हणाली "बरे केलेस, आता दोघांनी हात - पाय धुऊन घ्या व जेवायला बसा." पण तो मित्र काही केल्या जेवायला बसेना. जेवायला कसचं, घरातच येईना. पंता (संघातील आण्णा) पानावर बसता बसता म्हणाला, "अरे ये ना पानावर बैस."

"नको नको पुन्हा कधीतरी येईन" बाकीच्या सोवळ्यातील पंगतीकडे पाहून तो संकोचला व माघारला. लगबगीने आपल्या सायकलीपर्यंत गेला. हातातले वाढप थांबवून त्याच्यामागे आई धावत गेली व म्हणाली, "अन्न परब्रह्माच्या ठिकाणी असतं, तेव्हा वाढलेले अन्न डावलू नये, समजलं ना ?"

"पण.... पण आण्णाची आई, तुमची देवा ब्राह्मणांची पंगत... आणि मी तर हरिजन आहे."

आई श्वास रोखून ऐकू लागली व म्हणाली,

"ब्राह्मण्य कातड्यावरून ठरत नसतं. आतड्यावरून ठरत असतं." आणि हे बघ 'य: ब्रह्मविद् स ब्राह्मण:' हे वचन जोगळेकर जाणतात."

आणि मग या ब्राह्मणासकट पंगत पार पडली हे सांगायला नकोच.

सुप्रसिद्ध लेखक श्री. भा.रा. भागवत हे त्यांच्या आईला मामी म्हणत. ते त्यांच्या आईबद्दलच्या आठवणी सांगताना लिहितात.

"आम्ही तिघे भाऊ, तिघी बहिणी. पण प्रत्येकांत मामीचा जीव गुंतलेला असे. इतकी मुलं असूनही तिचे एक मूल २ ते २॥ महिन्यांचे असताना गेले. त्या वेळी तिने केलेला 'माझी सारी आशा गेली हो' हा आक्रोश, जरी त्या वेळी मी शाळकरी मुलगा होतो, तरी माझ्या मनाला आज देखील स्पर्शून जातो. तान्ह्या मुलाच्या वियोगाने ही अवस्था होते, तर सोळा वर्षांचा, हातातोंडाशी आलेला माझा हौशी आणि हरहुन्नरी भाऊ प्रभा जेव्हा टायफॉइडने

गेला, तेव्हा तिची काय अवस्था झाली असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी! कितीही जणांना दिले तरी न संपणारे असे हे प्रेम आईच करू जाणे."

एक देवभक्त आई आपल्या मुलांकरिता काय करू शकते हे वि.ना. कोठीवाले ह्यांनी त्यांच्या आईबद्दलच्या आठवणीत लिहून ठेवले आहे. इ.स. १९१४ साल. अवर्षण व अन्य इतर कारणांमुळे त्या वेळी संपूर्ण महाराष्ट्रात अन्नान्न दशा झाली होती. पदरचे होते नव्हते ते मोडून जीव वाचवायची पाळी आली होती. आम्हीही तीन जीव, गेले तीन दिवस काहीही खायला न मिळाल्याने उपाशी होतो. चौथ्या दिवशी मात्र पूजा झाल्यावर तिची दृष्टी त्या दीड तोळ्याच्या खंडोबाच्या टाकावर गेली. हा... हा म्हणता त्या टाकावरून तिने वरवंटा फिरवला व त्या टाकाला निराकार केले. सोन्याच्या त्या खंडोबाला सराफाकडे नेले. आपल्या पोटच्या पोरांना वाचवण्याची काय तिची ती केविलवाणी धडपड आणि देव् साधनांचा अशारीतीने उपयोग करून घेण्याची काय तिची ती दूरदृष्टी. त्या वेळी माझ्या आईने उत्तर दिले ते असे होते, 'बाळ, पडत्या काळांत देवसाधनांचा, देवद्रव्याचा उपयोग उपाशी जिवांनी नाही करावयाचा तर केव्हा करायचा?

अशा कठीण समयी, प्रसंगी देवानांही विकणारी ही माता एरवी कशी होती ते खालील गोष्टींवरून सहज समजावे.

राष्ट्रगुरू श्री समर्थ रामदास ह्यांच्यावरील महीपतीने लिहिलेल्या सत्तावीस अध्यायांचा 'संत विजय' या ग्रंथाचे संशोधन प्रसिद्धी करण्याच्या वेळची गोष्ट. वास्तविक हा ग्रंथ शके १७१२ रोजी ग्वाल्हेरीस महीपतीने पूर्ण केला. या ग्रंथात श्रीसमर्थ रामदासस्वामींचे 'धर्मकारण व राजकारण वर्णिले असून बेदरचा बादशहा जमाल शहा यांचे हिंदूकरण स्वामींनी केल्याचे वर्णन आहे. सदरहू संतविजय अपूर्ण स्थितीत - कळस अध्याया शिवाय - साठ वर्षापूर्वी छापण्यात आला होता. आणि या ग्रंथाची जीर्णशीर्ण प्रत महाराष्ट्र संत कवी चरित्रमालेचे इंग्रजी लेखक ख्रि.वा. डॉ. जस्टीन इ. ॲबट (न्यू जर्सी) अमेरिका यांच्याजवळ होती.

१९२६ च्या ऑक्टोबर महिन्यात डॉ. ॲबट यांचे सहकारी संपादक कै. पंडित नरहर रामचंद्र गोडबोले यांच्या मार्फत संतविजय ग्रंथासंबंधी जाहिरात दिली होती. आणि ग्रंथ उपलब्ध होण्याची त्यात पृच्छा केली होती. ग्रंथाचा उर्वरित भाग कळसाध्याय आबासाहेब मुजूमदार, म.म. दत्तो वामन पोतदार, कै. तात्यासाहेब मेहेंदळे इत्यादींनी हा कळसाध्याय संशोधन करून पूर्ण केला. त्या वेळी मी 'वारकरी पाक्षिकात' काम करत होतो. आणि 'अधिक माहात्म्य

कथामृत' हा अनुवादित ग्रंथ लिहिण्यास घेतला होता. संत विजय हा असा २ भागात असलेला पाहून मुंबई येथील प्रसिद्ध कै. दामोदर सावळाराम यंदे शेठ यांनी हा ग्रंथ समग्र छापण्याचे ठरवले. तशी बोलणी त्यांनी गोडबोले व मेहेंदळे यांजकडून सुरू केली. या दोघांनी ग्रंथांचे हक्क म्हणून म्हणा वा माझ्या अठरा विश्वे दारिद्र्याकडे पाहून म्हणा मला रु. १५०० /- देणगीदाखल देण्यासंबंधी श्री. यंदे शेटजी यांना सांगितले व त्यांनीही ते मान्य केले. यंदे शेटजींनी दिलेली रु. १५०० /- ची थैली मी आनंदाने घरी नेऊन आईच्या समोर ठेवली व एकंदर हकीगत सांगितली. सर्व हकीगत ऐकल्यावर आईने माझी कानउघाडणी केली. ती म्हणाली,

"सुपुत्रा, तू नाम विक्रय केलास!" त्यापेक्षा मला का नाही विकलेस? आणि ह्या गोष्टी व्यवहारात येईपर्यंत माझ्या कानावर देखील घातले नाहीस? इतका तुझा जन्मदात्या आईवर विश्वास? अरे या १५०० /- रुपयांनी का तुझी माडी कळसाला जाणार आहे? मग तू तरी लेखक म्हणून कशाला मिरवतोस?"

आईच्या तोंडून निघालेला तो नाम विक्रय हा शब्द व एकंदरीत तिची प्रतिक्रिया मला इतकी लागली की मी ते रु. १५०० /- परत करून त्यांना म्हणालो, "माझ्या आईची भावना लक्षात घेता मला हा रु. १५०० /- चा नाम विक्रय करावयाचा नाही. कृपा करून ही रक्कम आपण परत घ्यावी"

अर्थात प्रकाशकाचा व्यवसायदंडक जाणून मी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे तसा फुकट करार करून दिला. मोबदल्यात शेटजींनी मला १०० प्रती देणगी दाखल दिल्या. नंतर त्यातली एक प्रत डॉ. अ‍ॅबट याजकडे व एक प्रत गोडबोले यांजकडे पाठवून एकंदर सर्व गोष्टी माझ्यासंबंधीच्या त्यांना कळवल्या. त्यावर डॉ. अ‍ॅबट यांचे मोजक्या शब्दात उत्तर आले. ते असे...

"धन्य ती माता की जिने आपल्या मुलाला नामविक्रयाच्या पापातून वाचवले व भावभक्तीचा, त्यागाचा धडा आपल्या मुलाला शिकवला. ही माता मी माझ्यापेक्षा कितीतरी अधिक श्रीमंत समजतो."

काकासाहेब कालेलकरांनी त्यांच्या आईने केलेले त्यांच्यावरील संस्कारपर त्यांच्या लहानपणची एक छानशी गोष्ट सांगितली, "प्राथमिक सर्व संस्कार आपल्याला आपल्या मातेकडूनच मिळतात. त्यात लहानांनी मोठ्यांशी कसे वागावे, समाजात कसे वागावे, यापासून ते आपला धर्म, धर्माने घालून दिलेले नियम व त्यातील संस्कारापर्यंत सर्व काही येते.

आमच्या खेडेगावात एका हरिजनाची पत्नी बाळंत झाली. त्या काळी

'हरिजनांना शिवणे पाप आहे, त्यांची वस्ती देखील गावाच्या अगदी बाजूला असली पाहिजे' वगैरे रूढी, धर्म आम्हाला माहीत होता, पटला होता व आम्ही पाळत देखील असू.

आम्हाला कळले की त्या हरिजन बाईच्या घरी दुसरे कोणी नव्हते. आईला हे कळताच ती ताबडतोब तिच्या त्या झोपडीत गेली. बिचारीची ती पहिलीच वेळ असल्याने आईने तिला सांभाळले. गरम पाण्याने आंघोळ घातली. घरून तिच्यासाठी शिरा मागवून तिला तो खाऊ घातला. आणि तिचे कपडे धुऊन आई परत आली. घरी आत न येता बाहेरच तिने स्वत:च्या आंघोळीची तयारी केली. अस्पृश्यतेचे सर्व नियम पाळले. त्या वेळी मी लहान असलो म्हणून काय झाले, मी 'धर्ममार्तंड' रागावून आईला म्हटले,

'महाराच्या घरी तू गेलीसच का? तू घरी येऊन आंघोळ केलीस, कपडे बदललेस हे ठीक. पण त्यांच्या घरी तू जायलाच नको होतेस.'' असे तसे मी पुष्कळ आईला बोललो. मग आई मला म्हणाली,

''तुला हा सर्व धर्म कोणी शिकवला? मीच ना? तोच तू मला पुन्हा शिकवू पाहतोस? अरे, आपल्या धर्माप्रमाणे महार, मांग हे अस्पृश्य आहेत. त्यांना शिवता कामा नये, पण एक मुलगी बाळंत झाली आहे, तिचे संकट ऐकून मी गप्प कशी बसेन? तीही बाईमाणूस व मीही बाईमाणूस. तिचे संकट ऐकल्यावर मी जायला नको काय? हृदयाचा म्हणून काही धर्म आहे की नाही? त्या धर्माला जाणून मी धावून गेले. तिला मदत केली. तिचे सर्व निस्तरले व पुन्हा आपल्या घरी येऊन आंघोळ वगैरे केली. अशारीतीने आपला धर्म देखील सांभाळला.

बहीणाबाई चौधरींनी मराठीला एक वेगळ्या ढंगातलं, त्यातील सरळ, साध्या, सोप्या शब्दातलं अस अहिराणी भाषेतलं काव्य दिलं. एकदा सोपानदेव चौधरींनी (त्यांचा मुलगा) आपल्या आईचे हे (गावंढळ?) काव्य आचार्य अत्र्यांना दाखवण्याचं धाडस केलं. आचार्यांना ते दाखवलं मात्र ते तत्काळ उद्गारले, '' अरे हे नुसते काव्य नाही तर ही बावनकाशी सोन्याची खाण आहे.''

अशा ह्या बहीणाबाई विषयी सोपानदेव सांगतात...

त्यांच्या लहानपणी त्यांच्या वाड्यात शेजारी एक बाई राहत असत. तिच्याकडे तिची एक पोरकी भाची आश्रयास आली होती. ह्या आत्याबाई तिला पोटच्या पोरीप्रमाणे वागवायचा प्रयत्न करीत पण तिचे आबाळच होत असत. तिच्या वाटेला शिळी पोळी भाकरीच येत असे. त्यावर सोपानदेवांनी एकदा आपल्या

आईला विचारले "ह्या मुलीची ही बाई सख्खी आत्या असताना हे असे का होते ? आपल्या स्वत:च्या मुलीप्रमाणे ती तिला का वागवू शकत नाही ?"

"अरे, जन्मदात्या आईची सर आत्याला कशी येणार ?"

माय म्हणता म्हणता, ओठ ओठा लागे भिडे !
आत्या आत्या म्हणता, केव्हडं अंतर पडे ॥

माय हा शब्द देखील उच्चारताना ओठाला ओठ भिडतात. पण आत्या म्हणताना त्याच ओठांत देखील केवढे अंतर पडते. अरे, माय ती माय आणि आत्या ती आत्या. एवढं अंतर पडणारच !

माय म्हतली म्हतली, जशी तोंडातली साय।
बाय म्हतली बिरानी, जशी भरडली दाय ॥

माय म्हटले की जणू तोंडात साय विरघळल्यागत वाटते, पण तेच बाय (परकी बाई) म्हणताना चण्याची डाळ भरडल्यागत वाटते."

आईसंबंधी सांगताना ते पुढे एक छानशी गोष्ट सांगतात. ती गोष्ट वाचता वाचता कळत - नकळत फिरून एकदा डोळे पाणावतात.

शाळेत वर्ग चालला होता. भारतातील सर्वात थोर स्त्री कोण ? असे शिक्षकांनी विचारले. कुणी म्हणालं,

"सीता"

कुणी 'सावित्री' तर

कुणी द्रौपदी, तर कुणी म्हणालं 'जिजामाता'. एक ना दोन अशी अनेक उत्तरे मिळाली. शेवटी एका मुलाने गंभीरपणाने उत्तर दिले,

"माझी आई"

वर्गातली सारी मुलं फिदीफिदी हसली त्याचं ते उत्तर ऐकून. शिक्षकांनी त्या सर्व मुलांना दटावून गप्प केलं. शालेय शिक्षणाच्या दृष्टीने त्याने उत्तर चुकीचे दिले होते, तरी शिक्षक त्याच्यावर रागावले नाहीत. त्यांनी त्याला जवळ बोलावून घेतले. व विचारले "का बरं बाळ तुला तुझी आई थोर वाटते ?"

त्यावर तो मुलगा म्हणतो,

"माझे वडील ४ वर्षापूर्वी वारले. आता माझी आई मोलमजुरी करून आम्हा भावंडांना पोसते. मला तिनेच शाळेत घातले. माझी फी ती भरते आणि यथाशक्ती सर्व काही आमचं करते. आज तिने तिच्या ताटातली भाकर मला दिली. ती आता अर्धपोटीच राहिली असेल. खरोखरच गुरुजी माझी आई थोर आहे. भारतातीलच नव्हे, तर जगातील सर्व स्त्रियांमध्ये ती

मला थोर वाटते.''

असे म्हणून तो रडू लागला. वर्गातील बाकी सारी मुलं वरमली व शरमिंधी झाली.

या भूतलावर प्रचारात असलेल्या एकूण भाषांपैकी अशी अपवादात्मक तरी भाषा असेल का की जीमध्ये मातेसंबंधीचे वर्णन नाही? तिच्यासंबंधी काही गोष्टी वा कविता नाहीत? मला नाही वाटत अशी एक तरी भाषा असेल.

हिंदी भाषिक कविवर्य सूरदास यांनी कारुण्यमूर्त देवकीचे अतिशय सुंदर शब्दांत वर्णन केले आहे.

वर्णन आहे आठव्या पुत्राच्या जन्माअगोदरचं. ह्या आधीच्या सात पुत्रांची कंसाने केलेली हत्या तिने तिच्या डोळ्यांनी पाहिली आहे. हा वज्राघात साहून देखील आठव्या पुत्राच्या जन्मापूर्वी तिने तिचे मन अतिशय घट्ट केले आहे. आणि भविष्यातील अदृश्य जीवनाचा ती वेध घेत आहे. तिला मनोमन असं वाटत असतं की, आता सारी परिस्थिती पालटणार. क्षणभर ती प्रसूतिवेदना देखील विसरून जाते. पण लगेचच आठव्या पुत्राच्या रक्षणाची काळजी वाटून तिचे हृदय व्याकुळ होते. प्रत्यक्ष कंसाला पायबंद घालण्याचे तिच्यात सामर्थ्य नसल्याने ती विवश बनते. नि:श्वास सोडू लागते. प्रत्येक नि:श्वासाबरोबर ती परमेश्वराला आर्त स्वरात साद घालीत असते.

कंस, वंश को नाश करत है।<br>
कह लै जीव उबारौ ॥

कवीच्या लेखणीतून माता देवकीची व्याकुळता साकार होत होत वाचकाचे मन करुणामय रसांनी भरून जाते. तिचे मातृत्व अत्यंत प्रखर आहे. मातृत्वाच्या त्या नात्यापुढे इतर सर्व नाती ती विसरून जाते. कंसाबरोबर असलेले बंधुत्वाचे नाते तर तिने केव्हाच तटातट तोडून टाकले आहे. आणि अशा त्या कंसाचा विनाश करणारा पुत्र, आपल्या पोटी जन्माला येत आहे, ह्या वार्तेने देखील ती आनंदित झाली आहे.

''कंस काल जिय जानि गर्भ मै अति आनंद सभागी।''

इतक्या तिच्या भावना उत्कट झाल्या आहेत.

नंतरच्या काळात कृष्णाच्या बालपणीचे माता यशोदेकडील वर्णन तर सर्व प्रसिद्ध आहे, ते कन्हैयाच्या बाललीला म्हणून! गौळणींच्या गोपींच्या खोड्या करणे, त्यांच्या घरातील शिंकाळ्यातील, हंड्यातील ठेवलेले लोणी पळवून खाणे, ह्या तर त्याच्या आता नित्याच्या खोड्या झाल्या आहेत. यशोदा,

ह्या अशा कारणांकरता त्याला आता रोज रागावते आहे. तिच्या त्या रागे भरण्यात सुद्धा वात्सल्य आहे. कधी आज त्याच्या घरी, तर कधी उद्या त्याच्या घरी लोणी पळवून खाणे, हा त्याचा आवडता कार्यक्रम होऊन गेला आहे. आज त्याने त्याच्या स्वत:च्या घरातूनच लोणी पळवलं आहे. लोणी पळवताना माता यशोदेने पाहिलं आहे. वर्णन आहे ते त्या प्रसंगाचं!

यशोदा कन्हैयास विचारते आहे,

"कन्हैया, तै माखन खायो?"

बाल कृष्ण मातेस सांगत आहे,

"मा मै नही माखन खायो"

हे सांगत असताना तो वेगवेगळी कारणं सांगून माता यशोदेस पटवून देतो की, माँ, "मी कसे लोणी खाऊ शकेन! तू तर मला भल्या पहाटे गाई रानात चरावयास पाठवतेस, आणि तेथून मी सायंकाळी परततो, मग मला लोणी खायला वेळ तरी कोठे आहे? दुसऱ्या युक्तिवादात तो म्हणतो, लोण्याची शिंकाळी तू वर ठेवतेस आणि मी तर एवढासा. सांग, माझा हात तेथपर्यंत कसा बरं पोहचेल?"

हे त्याचे युक्तिवाद चालले असताना त्याच्या तोंडाला लागलेले लोणी मात्र, त्याने खाल्लेल्या लोण्याची साक्ष देत असते. त्याचे हे लटके युक्तिवाद पाहून माता यशोदेस मनातल्या मनात हसू येत असतं.

इकडे कृष्णाला कळून चुकतं की आपली लबाडी आईस कळली आहे. यशोदा पण मोठ्या मनाने आता कृष्णाला सांगते, "बरं बाबा कन्हैया, तू लोणी नाही खाल्लंस! बस्स!"

ह्या ठिकाणी सूरदास कवींची लेखणी इतकी समर्थ वाटते की काव्य वाचताना, ऐकताना प्रसंग डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा राहतो. आता यशोदा म्हणत आहे.

"कन्हैया तै नही माखन खायो"

कृष्णा, तू लोणी नाही खाल्लस आणि तिच्या डोळ्यांतून पाणी येत आहे. प्रसंग असा आहे की, ह्या क्षणाला लोणी खाल्ल्याचं दोघांनाही माहीत आहे. पण आता दोघंही म्हणतात, लोणी नाही खाल्लं म्हणून! यशोदेने कृष्णाला उराशी धरलं आहे. दोघांच्याही डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहत आहेत आणि एकीकडे यशोदा कृष्णास म्हणत आहे, "कृष्णा, मै नही माखन खायो."

कृष्ण मनात म्हणतो आपण लोणी कस खाल्लं नाही हे सांगायचे खूप प्रयत्न केले. पण आपली लबाडी तर तिला कळून चुकली आहे. आता

तिच्यापासून लपवून ठेवण्यात तरी काय अर्थ आहे. सूरदासांचा कन्हैया इथे किती सहजपणे शब्दांची करामत करतो ते पाहण्यासारखं आहे.

कन्हैया म्हणतो आहे "मै नही माखन खायो आणि अचानक त्याच्याच शब्दात म्हणू लागतो "मै ने ही माखन खायो"

हा सगळा प्रसंग सूरदासांनी काव्यात इतका यथार्थपणे गुंफला आहे की, यशोदा व कन्हैया मधील तो प्रसंग जसाच्या तसा डोळ्यांसमोर उभा राहतो.

आईसंबंधी वर्णन करताना डॉ. बिन्दु अग्रवाल म्हणतात, "स्त्रियांच्या अनेक रूपात मातेचं रूप हे सर्वात गौरवशाली आहे. वेदात मातेस पृथ्वीस्वरूप वर्णिले आहे. पृथ्वीप्रमाणेच ती आपल्या मुलांना धारण करते. त्यांना कायम धीर व सहिष्णुता देत राहते. आणि ती तिच्या पुत्राचे कायम भलेच चिंतित राहते. आणि म्हणूनच हे तिचे ऋण कधीही फेडता न येण्यासारखे असं आहे.

'गोदान' ह्या प्रेमचंदच्या प्रसिद्ध कादंबरीत मातेविषयी अत्यंत सुरेख शब्दांत ते लिहितात.

'नारी केवल माता है और उसके उपरान्त वह जो कुछ है, सब मातृत्वका उपक्रम मात्र है। मातृत्व संसार की सबसे बडी साधना, सबसे बडी तपस्या, सबसे बडा त्याग, और सबसे महान विजय है। एक शब्द में उसे लय कहूँगा जीवन का व्यक्ती का और नारीत्व का भी।'

तर दुसरे हिंदी लेखक प्रताप नारायण श्रीवास्तव 'बिदा' मध्ये म्हणतात 'माँ शब्द का अर्थ है दया, क्षमा, और ममता! स्नेह और वात्सल्य का अंतिम रूप है माँ!"

अगदी थोडक्या शब्दात पण किती सुंदर वर्णन केले आहे आईचे नाही?

आता ही कविता आहे एका इंग्रज कवीची. कवीचे नाव आहे विल्यम बेक आणि त्या कवितेचे नाव आहे "मृतमातेविषयी तिचे मूल व तिचा पती." ह्या कवितेत बाप मुलाला म्हणतो, "तू झोपेत रडतोस का रे? तू तुझ्या आईचा अत्यंत आवडता होतास."

त्यावर मुलगा उत्तरतो,

"बाबा, स्वप्नसृष्टी किती अद्भुत! माझ्या आईला मी पाहिलं जलाशयाच्या काठी, फुलांच्या ताटव्यात, पांढरी शुभ्र मेंढरे जात होती, तिथे आई उभी होती. आणि मी खूप रडतो बाबा, मला त्या स्वप्नसृष्टीत जाता येणार नाही का?"

वडील म्हणतात,

"या सृष्टीत जाऊनही मला ते सुख मिळालं नाही." शेवटी मुलगा म्हणतो, "अश्रद्ध व भयग्रस्त जगात राहण्यात काय अर्थ आहे? त्या स्वप्नसृष्टीत जावे"

तर जॉर्ज मॅकडॉनल्डने लिहिलेल्या कवितेत आई व मुलाचा संवाद पाहण्यासारखा आहे.

आई मुलाला विचारते,

"बाळ, तुझ्या डोळ्यांना हा निळा रंग कसा आला रे?"

"अग, आकाशानं दिला."

"आणि हे चिमुकले हात पाय?"

"अग, ते देवदूताने आपले पंख कापून बनवले"

"आणि एखाद्या मोत्याच्या शिंपल्यासारखे कान कसे तुला मिळाले?"

"आई, परमेश्वर काही बोलला तर त्याची ती देववाणी ऐकण्यासाठी हे कान इथे उगवले."

ह्या त्यांच्या संवादात शेवटी आई विचारते, "आणि तू इथे कसा आलास रे?"

तेव्हा "तुझी परमेश्वराला आठवण झाली, म्हणून त्याने मला तुझ्याकडे पाठवले."

तर ई. लेगेव ह्यांनी आईसंबंधी म्हटलं आहे की, "पृथ्वीवर आई हीच अशी एक देवता आहे की, जिच्याबद्दल कोणी नास्तिक नाही."

आणि आता ही गोष्ट भगिनी निवेदिताच्या आईची. निवेदिता ही स्वामी विवेकानंदाची शिष्या. सन १८६७, २४ ऑक्टोबर हा तिचा जन्मदिवस. ही मूळची आयर्लंडची. हिचे मूळचे नाव मागरिट एलीझाबेथ नोबल. हिचे आजोबा पाद्री व वडील देखील पाद्री. ख्रिस्ती धर्माचा उपदेश करणारे भटजीमहाराज, सॅम्यूअल रिचर्ड नोबल हे तिच्या वडिलांचे नाव. आईचे नाव मेरी अिसॅबेल नोबल. ह्या दोघांच्या पोटी 'अलस्टर' ह्या शहरी ती जन्मास आली. कुशाग्र बुद्धीची व निश्चयी मुलगी.

पुढे जेव्हा स्वामी इंग्लंडमध्ये गेले तेव्हा मागरिटची व त्यांची गाठ पडली. त्यांच्या बोलण्याची, वागण्याची व समजावून सांगण्याची मागरिटवर छाप पडली. व ती स्वामींची शिष्या झाली. ८ मार्च १८९९ रोजी.

वास्तविक ती २८ जानेवारी १८९८ रोजी स्वामींबरोबर भारतात आली. पण तिची पूर्ण परीक्षा घेतल्यानंतरच तिला शिष्यत्व देण्यात आले. काही काळानंतरच स्वामींची प्रकृती बिघडली. स्वामीजी परत लंडनला आले. निवेदिता

आपल्या आईकडेच उतरली. आणि स्वामींची सोय शेजारीच एका बंगल्यात करण्यात आली. स्वामी विवेकानंदांच्या सेवेसाठी अमेरिकेहून श्रीमती फंक व ख्रिस्ताईन आल्या. भगिनी निवेदितापासून त्या चार पाऊले दूर राहायच्या. हिची आदब राखण्यासाठी ते होते. ख्रिस्ताईन व निवेदिता प्रथमच स्वामींच्या सहवासात असताना एकत्र येत होत्या. प्रत्यक्ष भेट होताच निवेदिता ख्रिस्ताईनला म्हणाली, "सद्गुरूवरील तुझ्या प्रेमामुळे तू मला आवडतेस. तुझी माझी आजपर्यंत प्रत्यक्ष ओळख नसेल, पण तुझ्या माझ्यात फरक काय ? गुरुसेवेत आपण दोघी सहकार करू." असे म्हणताच ख्रिस्ताईन विरघळून गेली. आपल्या कन्येच्या हृदयाची ही विशालता मेरी नोबलने पाहिली. त्या म्हणाल्या,

"ख्रिस्तासारखा थोर (विवेकानंद) गुरू भेटला व म्हणून मार्गारेट (निवेदिता) सेवायोगी झाली. धन्य ती, धन्य आमचे कूळ व धन्य आम्ही. हे पाहायला तिचे वडील हवे होते." मेरी बाईचे डोळे पाणावले. लगेचच काही दिवसांनी तिच्या बहिणीचे लग्न झाले. नंतर मेरी बाई आपल्या लेकीला म्हणाल्या,

"मार्गारेट, आता तू खुशाल गुरूसेवेस जा. परमार्थात तू बापसे बेटा सवाई होत आहेस." असे म्हणून त्यांनी तिला साश्रू नयनांनी निरोप दिला.

ही झाली १८९९ सालची गोष्ट. त्यानंतर भगिनी निवेदिता हिंदुस्थानातच स्वामींबरोबर राहत असे. १९०३ मध्ये त्या चाफेकर बंधूंच्या आईंना भेटायला महाराष्ट्रात आल्या होत्या. चाफेकर बंधूंना त्यांनी केलेल्या स्वातंत्र्य मागणी आणि इंग्रज अधिकाऱ्यांना मारण्याच्या प्रयत्नाच्या आरोपावरून इत्यादी त्यांनी केलेल्या गुन्ह्यावरून त्यांना फासावर लटकवण्यात आले होते. भगिनी निवेदिता त्यांच्या आईचे सांत्वन करायला आल्या होत्या. त्यांच्या मनात एकाहून एक अशा तीन कर्तृत्ववान पुत्रांच्या हानीबद्दल मी सांत्वन तरी कसे करणार, असे येऊन गेले. पण तितक्यात ती माऊलीच म्हणाली,

"ऊं! त्यात काय मोठंसं? मला माझी मुलं गेल्याचं दुःख नाही. मरण का कुणाला चुकलंय ? मला आणखी दोन मुलं असती तरी मी त्यांना देशासाठी मरा असंच सांगितलं असतं.

धन्य आहे त्या माऊलीची !

आता हे लिहीत आहे ही अगदी सत्य घटना व अगदी काल परवा म्हणजे १५ डिसेंबर १९८८ ची. ह्या काळात रशिया येथील अर्मेनिया ह्या भागात प्रचंड भूकंप झाला. ह्या भूकंपात प्रचंड हानी झाली. लाखो कोट्यवधी रुपयात मोजता येईल एवढी प्रचंड हानी झाली. त्या भागातील जवळ जवळ सर्वच घरं जमीनदोस्त झाली. लाखोंच्या संख्येने गुरेढोरे मेली. पण त्याहूनही

कळस म्हणजे झालेल्या मनुष्य हानीचा. ह्या भूकंपात अंदाजे दीड लाख लोक मरण पावले. त्यातील कित्येक लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याने मरण पावले. आणखीन कित्येक लोक ढिगाऱ्याखाली अडकून वाचले पण वेळेवर मदत न मिळाल्याने म्हणा वा वेळेवर ढिगारे उपसले न गेल्याने म्हणा वा त्यांना वेळेवर अन्नपाणी न मिळाल्याने ते मेले.

अशा अनेक ढिगाऱ्यांखाली गाडल्या गेलेल्या लोकांबरोबरच एका ढिगाऱ्याखाली एक आई व तिची तीन वर्षांची मुलगी सापडली. भूकंप झाल्यापासून त्यांना ढिगाऱ्याखालून उपसून काढण्यात ८ दिवस गेले होते. आणि एवढ्या कालावधीनंतर हाती लागणाऱ्या अनेक प्रेतांबरोबर हे दोन जिवंत जीव पाहिल्यावर सगळ्यांनाच आश्चर्य वाटले. त्यातल्या त्यात ती छोटीशी तीन वर्षांची बालिका जिवंत पाहिल्यावर तर सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. ही छोटीशी बालिका जिवंत राहिली तरी कशी? जो तो एकमेकांकडे पाहून आश्चर्य व्यक्त करू लागला. आणि मग कळले ह्या छोट्याशा बालिकेला जिवंत ठेवण्यामागे मोठा वाटा होता तो त्या माऊलीचा. सुरुवातीचे २ - ३ दिवस त्यांनी काढले अन्न - पाण्यावाचून. पण नंतर मात्र जिवंत राहणे कठीण जाऊ लागले. विशेषत: त्या लहानग्या पोरीला! हे त्या माऊलीने ओळखले. एकीकडे स्वत:ला अन्न - पाणी मिळत नव्हते. मदतीचा हात केव्हा मिळेल याची खात्री नव्हती, किंवा मिळू शकेलच की नाही हे सांगता येत नव्हते. आणि अशाही परिस्थितीत तिने त्या आपल्या लहानगीला वाचवले कसे? तर आपल्या स्वत:च्या हाताचे बोट कापून तिला रक्त प्यावयास द्यायची. एक नव्हे, दोन नव्हे तर सतत चार दिवस असे रक्त पाजून तिने तिच्या मुलीला वाचवले. त्या वेळी तिच्या पोटात अन्नाचा कण नव्हता की पाण्याचा थेंब!

खरोखर धन्य ती माता!

ब्रह्मवैवर्त पुराणात जन्मदात्री बरोबर इतर सोळा मातांचा उल्लेख केला आहे तो असा,

स्तन्यदात्री, गर्भधात्री, भक्ष्यदात्री गुरुप्रिया।<br>
अभीष्ट देवपत्नी च पितु:पत्नी च कन्यका॥<br>
सगर्भजा च या भगिनी स्वामीपत्नी प्रिया प्रसू:।<br>
मातुर्माता, पितुर्माता, सोदरस्था प्रिया तथा॥<br>
मातुपितुश्च भगिनी मातुलानी तथैव च।<br>
जनानां वेदविहिता मातर: षोडश स्मृता॥

दाई, गर्भधारण करणारी, अन्न देणारी, गुरुपत्नी, इष्टदेवतापत्नी, सावत्र

आई, सावत्र बहीण, ज्येष्ठ बहीण, स्वामीपत्नी (मालकाची, यजमानाची पत्नी) सासू, आईची आई, वडिलांची आई, ज्येष्ठ वहिनी, मावशी, आत्या, मामी या सर्व त्या सोळा माता !

वर उल्लेख केलेल्या सोळा माता या सर्वच आई म्हणवून घ्यायला लायक असतात. नव्हे यातील प्रत्येक आई एवढीच श्रेष्ठ ठरू शकते.

आमच्या घरापासून जवळच्याच वाड्यात एक कुटुंब राहत असे. त्यातील बाईला २ मुले - १ मुलगी व १ मुलगा. ह्या बाईचे यजमान सरकारी नोकरीमधे कामाला. खाऊन पिऊन सुखी इतकेच. सर्वात मोठी मुलगी अकरा वर्षांची. धाकटा सात-आठ वर्षांचा असेल, तेव्हाची गोष्ट. ह्या मुलांची धाकटी काकू अचानक गेली. काका काकू दूर राहणारे. त्यांना एकुलती एक मुलगी आणि ती देखील असेलं एक दोन वर्षांची. त्या मुलीला सांभाळणे, काकांना कठीण गेले असते, म्हणून त्यांनी तिला ह्यांच्या घरी आणून ठेवले आणि ह्या आईला जणू तिसरे मूल झाले. जशी तिची इतर दोन, तसे हे तिसरे. ना कधी कसली कुरकूर ना कुरबूर. "ह्या तुमच्या पुतणीमुळे माझ्या पोटच्या दोन मुलांच्या अन्नाचा घास कमी झाला." असे बोलणे देखील त्या आईच्या तोंडून कधी निघाले असेल असे वाटत नाही. इतर दोघांबरोबरच आणि सर्वार्थाने बरोबरीने ह्या मुलीची वाढ होत होती. मत्सरी बुद्धी असलेल्या शेजारच्या मात्र,

"ह्या इतर दोघांना अशा वागवतात व ह्या तिसरीला मात्र असे वागवतात." असे म्हणायचा प्रयत्न करायच्या. होता होता ही मुलं मोठी होत होती. ह्या मुलीने देखील आपल्या काका-काकूने आईवडिलांसमान केलेल्या प्रेमाची जाणीव ठेवली. त्यांची इतर दोन मुलं पदवीधर देखील होऊ शकली नाहीत, पण ही मात्र बी.एस्सी. झाली. काही प्रमाणात का होईना त्या काका-काकूंना कृतकृत्य झाल्यासारखे वाटले असेल.

आज त्यांच्या ह्या मुलीचे लग्न होऊन ती माता झाली आहे व बँकेत नोकरीस आहे. तिच्या काका-काकूंचे उपकार ती आयुष्यात कधीतरी विसरू शकेल काय ?

माझा एक मित्र. अब्दुल त्याचे नाव. ह्याचे वडील नेव्हीमध्ये होते. ते सेवानिवृत्त झाले आणि त्यांच्या जागी हा तिथे लागला. ७-८ वर्षानंतर अचानकपणे त्याचे वडील गेले. त्या वेळी हा येऊ शकला नाहीच. पण ४-५ दिवसांनी देखील त्याला येता आले नाही. पुढे हा नेव्हीतून सेवानिवृत्त झाला व एका बँकेत कामाला लागला. ज्या वेळी त्याला येथील बोलावणे आले, त्याच वेळी त्याला दुसऱ्या एका कंपनीत सुद्धा बोलावणे आले. त्या

वेळी त्याला बँकेत पगार मिळणार होता रु. १४०० /- तर त्या कंपनीत रु. २३०० /- पण कंपनीत नोकरी करण्यासाठी त्याला मद्रासला जावे लागणार होते. आणि त्याची नेमकी ह्याच गोष्टीला तयारी नव्हती. म्हटलं एवढा पगारात फरक आहे तर तू मद्रासला जा. त्यात काही अडचण असण्याचे कारण नाही. त्यावर तो म्हणाला, "वडिलांच्या शेवटच्या वेळी मी नव्हतो. आई म्हातारी आहे. आईच्याजवळ तरी मी शेवटपर्यंत असावे, अशी माझी मनापासूनची इच्छा आहे. मग त्याकरिता मला दोन पैसे कमी मिळाले तरी चालतील." वास्तविक त्याची मुलं व इतर फाफट पसारा बघता त्याला रु. २३०० /- सुद्धा पुरले नसते. पण केवळ त्याची ती इच्छाच तगवू शकते हे मात्र खरं! तो पुढे म्हणतो, "अरे, ज्या आईने मला लहानाचं मोठं केलं आणि ते करत असताना एवढे अनंत कष्ट सोसले, त्या आईकरता मला दोन पैशाचा मोह टाळता येऊ नये? नाही, मला ते जमलंच पाहिजे. आणि मी ते करणारच. निदान माझ्या म्हाताऱ्या आईसाठी म्हणून तरी!

खरोखर असे आईमध्ये असते तरी काय? काय आहे एवढं मोठं तीत? असं म्हणतात, आपण एकवेळ साऱ्या जगाला फसवू शकू, पण आपल्या मनाला नाही फसवू शकत. आणि आपल्या मनांत जे काही चालतं ते ओळखण्याची क्षमता मातेमध्ये असते. आणि खरं सांगू, आई ही आपल्या मुलांकरता एवढी पवित्र असते ना, की मुलाने आपले सर्व काही सांगून टाकावे. तिच्यापासून काही म्हणता काही लपवून ठेवू नये. एकतर तिच्यापासून काही लपून राहत नाहीच. पण आपण क्षणिक मोहाला बळी पडून तसे करण्याचा प्रयत्न केलाच तर आपण आपल्या आईला म्हणजे आपल्या मनालाच फसवल्या सारखं होईल. आणि हां..हां म्हणता आपण केव्हा वाइटाच्या मार्गाला लागू ते समजणार सुद्धा नाही. आणि आजपर्यंत, आपण चांगले असेपर्यंत, आपल्या भोवतालची चांगली अशी आपली मित्रमंडळी आपल्याला विसरायला लागतील. मुलाच्या वाइटातल्या वाईट परिस्थितीत सुद्धा धीर द्यायला त्याच्या पाठीशी उभी राहील ती त्याची आईच, दुसरे तिसरे कुणी नाही.

अशाच एका विद्वान आणि श्रीमंत माणसाची गोष्ट. एका उच्च पदावर असताना त्याच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप ठेवण्यात आला. त्याला त्या पदापासून दूर व्हावे लागले. ह्या गोष्टीनंतर ४-५ महिन्यातच त्याची आई गेल्याची बातमी प्रसिद्ध झाली. त्या वेळी माहीत नव्हतं, ह्या माणसाची आई जिवंत आहे म्हणून. पण मग मनात आलं, आई असताना ह्या माणासाने भ्रष्टाचार करावा? आणि लपवून ठेवाव्यात ह्या गोष्टी तिजपासून? काय वाटलं असेल

त्या माउलीला?'' ह्याचसाठी का ह्याला मी लहानाचा मोठा केला? ह्याचसाठी का ह्याला शिकवलं? हा जेव्हा उच्चपदावर बसला होता तेव्हा कसं मला भरभरून वाटल्यागत झालं होतं. आनंदाने आणि उल्हासाने किती रोमांचित झाले होते मी. आणि ह्याने अशा रीतीने त्या पदाचा गैरवापर करावा? हेच का मी त्याला शिकवलं?''

मुलाच्या वैभवाच्या शिखरावर असताना उल्हसित होणाऱ्या मातेचेच मन व्याकुळ झाले, अन्य दुसऱ्या कुणाचे नाही. आणि हा तिच्या मनावर झालेला आघात ती कधीच पचवू शकली नाही. त्यातच तिचा अंत झाला. काय वाटलं असेल तिच्या मनाला?

हेच का मी मुलावर संस्कार केले? हे करण्यास त्याचे मन धजावले तरी कसे? नाही..... त्या मातेचं मन आपल्या मुलाने केलेले कृत्य पचवूच शकलं नाही.

खरोखर, ज्या मातेने आयुष्यभर मुलावर केलेले संस्कार, मुलगा जर क्षणिक मोहाला बळी पडून आयुष्यभर झालेल्या सु - संस्कारांचा क्षणात बट्ट्याबोळ करीत असेल, तर तो आघात त्या मातेला सहन व्हावा तरी कसा? आणि तुम्हाला काय वाटतं? त्या माणासाचे मन खात नसेल? असं होणं शक्यच नाही. त्याचं मन देखील खात असेलच. पण.... पण करतो काय बिचारा! आपल्या मनाची व्यथा जिच्याजवळ तो बोलून दाखवू शकत होता, ती माताच तो आज हरवून बसला होता. आणि आता तर त्याचं मन अधिकच खाऊ लागलं. आणि त्याला वाटायला लागलं की, मी माझ्या अशा ह्या कृत्यामुळे मला पदच्युत तर व्हावं लागलंच, पण त्याहून माझं कधीही भरून न येणार असं नुकसान करून बसलो. माझ्या ह्या असल्या कृत्यामुळे आई गेली. जिने माझ्यासाठी स्वत:च्या रक्ताचं अक्षरश: पाणी पाणी केलं आणि मला तळहाताच्या फोडाप्रमाणे वाढवलं, त्या आईला माझ्या ह्या हातांनी मारलं.

पण आता मागाहून पश्चात्ताप करून उपयोग होणार होता थोडाच. जे व्हायचे होते ते होऊन गेले. आज तो माणूस, जो एके काळी वैभवाच्या व मानाच्या अत्युच अशा शिखरावर होता, तो वैभव व मान तर हरवून बसलाच, पण त्याच बरोबर आपल्या मातेला देखील हरवून बसला आहे.

जन्मदात्री शिवाय सोळा माता असतात हे आपण मागे पाहिले आहेच. त्यात वडिलांच्या तसेच आईच्या बहिणीचा, म्हणजेच आत्या व मावशीचा समावेश आहे.

एखादा प्रसंग वा घटना मग ती छोटीशी जरी असली, तरी मनात कायमचे

घर करून राहते. मनात राहते ती व्यक्ती सुद्धा.

साधारण सात - आठ वर्षापूर्वी माझ्या आईला एका ऑपरेशन करता २० - २५ दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आलं होतं. त्या वेळी आमचे नातेवाईक तिला भेटण्यासाठी जात असत. माझ्या लक्षात आहे की माझी एक मावशी मात्र हॉस्पिटलमध्ये न जाता ती सरळ आमच्या घरी आली. कुठल्याही घरात कर्ती बाई नसल्यावर जसं दृष्य असतं आणि आमच्याकडे देखील तसंच असेल असं तिला अपेक्षित असावं - म्हणून ती हॉस्पिटलमध्ये न जाता सरळ आमच्या घरी आली असावी. गेले पंधरा दिवस केर वगैरे निघत होता, पण कानाकोपऱ्यातून नव्हे. धुणं, धुतलं जात होतं, पण कपडे म्हणावे तेवढे स्वच्छ दिसत नव्हते. रोजच्याप्रमाणे स्वयंपाक होत होता, जेवणं होत होती, पण मागचं जसं स्वच्छ असावयास हवं तसं, राहत नव्हतं. कारण ह्या सर्व गोष्टींवरून त्या कर्त्या बाईचा हात फिरत नव्हता. केवळ कर्तव्यबुद्धीने कामं पार पडत होती.

मला आठवतंय त्या दिवशी मावशी आली आणि तिने स्वयंपाकघराचा ताबा घेतला. स्वयंपाक करण्यासाठी नव्हे, तर गॅसवर गेले पंधरा दिवसांपासून सांडत आलेले वरणाचे व तेला - तुपाचे डाग पुसण्याकरता, आणि पिण्याच्या पाण्याच्या पिंपाखाली साठलेले शेवाळेवजा बुळबुळीतपणा घासून काढण्याकरता !

होय ! त्या दिवशी आमच्या घराबद्दलची तीच आपुलकी व जिव्हाळा व्यक्त होत होता मावशीकडून की जो रोज आईकडून होत असतो. तो तिच्या छोट्याशा काम करण्याच्या भूमिकेतून. चिरंतन लक्षात राहील असा तो प्रसंग आणि माझी ती मावशी. मग अशी मावशी मला माझ्या आईहून वेगळी कशी व का वाटावी ?

विचार करता करता मन मागे जातं ते अशा ह्या आईनामक अद्भुत व अगम्य अशा ह्या कोड्याच्या मूळापर्यंत. आणि लक्षात येते ते हे की, माता आपल्या मुलावर किती सहजपणे संस्कार करत असते.

बाळ मातेचं ऐकतं, ते तिचा शब्द मानतं म्हणजे काय करीत असतं माहीत आहे ? तो नुसता आज्ञाधारकपणा थोडाच असतो ? ती असते एक फार मोठी देवाण - घेवाण. संस्काराचा प्रारंभ म्हणतात तो हाच. आई - वडिलांचा शब्द पाळला असता त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो, त्या आनंदाच्या भावनेपोटी बाळाला शाबासकी मिळते. मायेचा हात तोंडा-पाठीवरून फिरतो आणि ह्या भरपाईच्या मोबदल्यात बाळ आई - वडिलांना त्याज्य वाटणारी, न आवडणारी गोष्ट करायचं सोडून देतो. काय खरं की नाही ? म्हणजेच बाळ एका आनंदाला

मुक्तं व दुसऱ्या आनंदाला जवळ करतं. अर्थात हा सराव व्हायला व ती समज यायला अनेक कसरती कराव्या लागणं अपरिहार्य असतं. अशा कसरती एकीकडे करीत असताना कित्येक वेळा माता अतिशय बिकट परिस्थितीत सापडतात. उदा. घरात पाठीवर भावंड यावयाचा प्रसंग. एकीकडे बाळाच्या मनाची कितीही तयारी केली तरी आपल्या हक्कातला हा नवा वाटेकरी त्याला स्वभावत:च नकोसा वाटू लागतो. त्याला गेले सात-आठ दिवस जाणवत असलेली आईची गैरहजेरी, ह्या बाळामुळेच - हे लवकरच लक्षात येते. आणि आता त्याला जाणवतं ते आपल्या आईचं आपल्यापासून दूर - दूर वागणं. हे सर्व काही त्या बाळामुळेच, हे त्याचे ग्रह पक्के होत जातात. आणि त्याला वाटणारा बाळाबद्दलचा दुस्वास सुरू होत जातो. काही केल्या समजूत पटत नाही. धाक दाखवून देखील म्हणावा तसा परिणाम साधता येत नाही, केवळ धुसपूस असते, तोपर्यंत ठीक! पण जर का नवीन बाळाच्या शरीरालाच अजाणतेपणे का होईना इजा होण्याचा संभव झाला तर काय करावं ते समजत नाही. मातेच्या डोळ्यांत पाणी ठरेनासं होतं. आपलेच दात आणि आपलेच ओठ! तिचा कधी नव्हे असा कोंडमारा सुरू होतो. आणि त्यातूनच त्या परिस्थितीतूनच ती वाट शोधण्याचा प्रयत्न करते. ती त्या मोठ्याला हरतऱ्हेनं समजावून सांगण्याचा प्रयत्न करत असते. नाना क्लृप्त्यांनी त्याचे मन तयार करत असते. क्वचित व आवश्यकतेनुसार त्यात एखाद्या रट्ट्याची भर सुद्धा पडते. अशाप्रकारे ती मुलाला घडवत असते. मातेच्या अशा संस्कार करण्याच्या काही खास पद्धती असतात. माझ्या पाहण्यात अशी एक खाष्ट माता आहे की तिच्या जरा मनाविरुद्ध घडलं की हातात काय असेल ते घेऊन मारलंच म्हणून समजा. गालावर, पाठीवर किती रट्टे खावे लागले असतील त्याला गणतीच नाही. पण त्यानंतर मात्र काहीच नाही. शासन केलं, संपलं! मग आपण आठवावं आपलं काही चुकलं का? ती चूक टाळण्याचा विचार करायला लावणारे ते शासन, पुन्हा पुन्हा चूक टाळण्याची उजळणी करायला लावते. थोडक्यात आई-वडिलांची गैरमर्जी घडताच अवखळातल्या अवखळ मुलाला पाण्याशिवाय असलेल्या माशासारखे वाटले पाहिजे. तिथेच तर त्या वडील माणसांच्या मर्जीची कसोटी आहे. जिथे अशा प्रेमाचा आणि अशा प्रेमळ माराचा देखील वापरच नाही ते घरच नाही.

रागाने वा लोभाने मुलाच्या कलाकलाने केवळ आईच करू जाणे. तसेच लोभाशिवाय प्रीती करणारी देखील एकटी आईच. तुकाराम महाराजांचा एक सुंदर अभंग आहे.

लेकुराचे हित ! वाहे माऊलीचे चित्त ॥
ऐसी कळवल्याची जाती । करी लाभविण प्रीती ॥
पोटी भार वाहे । त्याचे सर्वस्वही साहे ॥

अपंग, लंगडे, आंधळे, पांगळे, असे मूल कोणाच्या प्रेमाच्या आधारे जगते ? कोण प्रेम करते त्यावर ? कुणाच्या कुशीत वाढते ते मूल ? सगळ्या जगापेक्षा मोठा आश्रय कुठे असतो त्या मुलाला ?

एक आईच !

एकीकडे सगळे जग त्याची टिंगल, टवाळी करत असते. आणि दुसरीकडे त्या मुलाची आई त्याला जीव लावून त्याच्यावर प्रेम करत असते.

आपल्या हिंदू धर्मात अनेक देवींना माता म्हणून संबोधण्यात आलं आहे. उदाहरणार्थ अंबामाता, दुर्गामाता, कालीमाता इत्यादी. ह्या प्रत्येक देवींना माता म्हणून ओळखण्याचे कारण म्हणजे अनेकविध रूपांपैकी एक वा एकाहून अनेक रूपं ह्या देवींनी घेतलेली दिसतात. कुठे ती सज्जनांचे तारण करणारी, तर कुठे दुर्जनांचे हरण करणारी अशी दिसते. ह्या देवीच्या अंगी दिसणाऱ्या मातेसदृश गुणांमुळेच त्यांना माता म्हणून संबोधण्यात येत असावे.

निसर्गात घडणारी अनेक चमत्कारिक स्थित्यंतरे, त्यात होणारे बदल, कुठे निसर्गाचे विविधरंगी फळा फुलातून दिसणारे ते कोमल नाजूक असे स्वरूप, कुठे खोल दूरवर अथांग असे पसरलेले सागरस्वरूप, कुठे त्याच सागरातून उठणाऱ्या घनगंभीर अशा लाटांचे खळखळणारे स्वरूप, तर कुठे भव्य दिव्य असे त्याचे पर्वतराजीतून व्यक्त होणारे स्वरूप, खरं म्हणजे ही झाली त्याची नानाविध रूपं. पण त्याची अधिक निरनिराळी स्वरूपं पाहावयास मिळतात ती रोज नियमित उगवणारे चंद्र, सूर्य, तारे, चंद्राच्या क्रमाक्रमाने वाढत जाणाऱ्या व नंतर क्रमाक्रमाने कमी होत जाणाऱ्या कला, तर अचानकपणे उगवणाऱ्या धूमकेतूतून ! तर नियमित असे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे त्याचे ऋतुचक्राचे स्वरूप आणि त्यातच अचानकपणे मध्येच येणारे त्याचे ते वादळी स्वरूप.

हे व असे सर्व अनाकलनीय व आपल्या आवाक्याबाहेरचं, विचारशक्तीच्या बाहेरचं असं ज्या वेळी मनुष्याला वाटतं, तेव्हा मनुष्याला पटतं की, नाही, ह्या निसर्गाच्या होणाऱ्या बदलामागे, घडामोडीमागे कुणीतरी आहे. आणि हे असं वाटणं आजच नाही तर अनादी काळापासूनच आहे. आणि हे केवळ आपल्यापुरतं सीमित नाही, तर जगातील कानाकोपऱ्यापासून प्रत्येकास वाटत आलं आहे. आणि ह्या अशा वाटण्यातूनच श्रद्धा, भक्ती, निर्माण झाली आहे. श्रद्धा आणि भक्ती म्हणजे तरी नक्की काय ? तर निसर्गाच्या ह्या

नियमित, अनियमित होणाऱ्या बदलाचे, होणाऱ्या स्थित्यंतराचे, आपल्या मानवाच्या तोकड्या अशा ज्ञानातून समाधान न झाल्याने दुसऱ्या कुणावर तरी विसंबणे, अवलंबून राहणे आणि अशातूनच निरनिराळ्या देवींची निर्मिती झाली असावी. पुढे जी माहिती देत आहे ती निरनिराळ्या देशातील, निरनिराळ्या संस्कृतीतील वेगवेगळ्या कारणांकरिता मानण्यात आलेल्या देवींची.

- ईश्तर देवी - माता म्हणून बॅबिलोनियन संस्कृतीप्रमाणेच सुमेरियन संस्कृतीत मानण्यात आले.

'गिल गमिश' या महाकाव्यात एम्लील देव एकदा पृथ्वीवर जलप्रलय घडवून आणतो, असा प्रसंग आहे. तेव्हा ईश्तरच्या मातृभावना जागृत होतात व त्या कशा उफाळून येतात याचे सुरेख वर्णन केले आहे. ती एम्लील देवाचा धि:कार करताना म्हणते,

''माझ्या सर्व प्रजेला तू नष्ट केलेस! एवढ्याचसाठी का मी प्रजोत्पादन घडवून आणले होते? हे देवादिकांनो, माझा गळ्यातील हिरेमाणकांचा जसा मला विसर पडणार नाही, तसाच आजच्या ह्या संहाराचा दिवस देखील मी कधी विसरणार नाही.

- प्राचीन मिसर देशात (इजिप्त) आयसिस् नावाची मातृदेवता होती. सिकंदरच्या विजयानंतर हिच्यां भक्तांची संख्या वाढली. व आयसिस् देवता इटलीमध्ये सिसली पर्यंत जाऊन पोहोचली.

पश्चिम आशिया मध्ये मॉ (मॉट) नावाच्या देवतेची उपासना चालू होती. पश्चिम आशिया व ग्रीस, रोम, उत्तर आफ्रिका यांतील आयसिसच्या मूर्ती याच मॉट देवतेच्या मूर्ती होत. इ.स. ४ थ्या शतकात ही देवता लुप्त होत आली. पण सूक्ष्म प्रमाणात तिचे रूपांतर कुमारी मेरी मातेत झाले.

- तियामत ही बॅबिलोनियन् देवता असून ती शक्तिमाता आहे.

- मिलीत्ता हिचे रूप दांपत्य देवीचे! ग्रीक नाव आफ्रीदीती, रोमन नाव व्हीनस व भारतीय नाव रती असे मानले जाते.

- कुमारी मेरी माता, येशूचा जन्म मेरीच्या पोटी झाला असे मानण्यात येते. हिला रोमन कॅथॉलीक, यहुदी, मिसरी ख्रिश्चन, ईश्वरी माता म्हणून मानतात. कालांतराने प्रोटेस्टंट धर्मगुरूही तिला आदी शक्ती मानू लागले.

- ग्रीक देवता (१) हेरा - हिला विवाहदेवता, प्रजोत्पादन देवता व सृष्टीकर्ती म्हणून ओळखले जाई.

(२) आरिमीस, जंगली श्वापदांची जननी, नवजात बालकाचे शत्रूपासून संरक्षण करणारी (आपल्याकडील सटवाईप्रमाणे)

(३) अहेना, ही गृहदेवता, स्थापत्य शिल्पकलांची देवी मानली गेली. ही देवी मुलांना साहसी बनवते व मुलींना गृहकार्यात मग्न ठेवते.

- चिनी मातृदेवता. (१) ई- इ - चिन्ग, सृष्टी निर्माती, हिने सृष्टी प्राणी, चराचर विश्व निर्माण केले. आद्य मातृशक्ती जिच्या पूजनाने मुक्ती प्राप्त होते.

(२) क्वान - शि - यान, महा मातृशक्ती व कृपेची स्वामिनी, प्रजोत्पादनाचे कार्य करते.

ही व अशी अनेक उदाहरणे पाहिली की खात्री पटते, मनुष्य ह्या चराचरातील, निसर्गातील सतत होणारा बदल, आणि त्या होत असलेल्या बदलांना आपण समर्थपणे तोंड देऊ शकणार नाही असे वाटते, तेव्हा तो कुणावर तरी विसंबून राहतो आणि त्याप्रमाणे त्याच्या जन्मापासून वेळोवेळी, प्रत्येक क्षणी जेव्हा जेव्हा त्याला असहाय वाटत असतं, त्या वेळी त्याला मदत करणारी माता त्याला आठवते. इथे जणू तो अनेकविध मातांवरतीच विसंबून राहण्याचा प्रयत्न करतो. आणि अशा वेळी तिच्याबद्दल वाटत असणारी श्रद्धा, प्रेम, निष्ठा तो ह्या ना त्या रूपाने व्यक्त करीत असतो.

अशी ही मातेची महती वाचता वाचता मग स्वाभाविकपणे मनात प्रश्न उभा राहतो की, जर खरोखर माता एवढी प्रभावी असेल तर मग पुरुष श्रेष्ठ की प्रकृती? तसे पाहता हा वाद मग माजण्यासारखा आहे. परंतु खरे म्हणजे जगाच्या निर्मिती करता व विकासाकरता जगन्मातेने बुद्ध्या - जाणूनबुजून अबलत्व स्वीकारले आहे. यालाच उत्क्रांतिवाद - पुरुषाने आपल्या सामर्थ्याने स्त्रीवर वर्चस्व मिळवले असे मानण्यात येते. पण हे अबलत्व अत्यंत संयमी व सार्थ असल्याने महान् पराक्रमी व बलवान असे आहे. स्त्रियांच्या अबलत्वात उत्कट सामर्थ्य आहे. आणि म्हणूनच वेगळ्या रूपात प्रकट होऊन नव निर्मितीचे संवर्धन करते. माताच नव्या मुलाला जन्म देते. मातृकल्पनेतच नव्या जगताची उभारणी आहे. आणि त्यातूनच नवीन संस्कृती उदयाला येते. आणि म्हणून माता ही संस्कृतीची जननी आहे.

जगन्मातेची पूजा करायला निघालेल्या रवींद्रनाथांचे विचार पाहण्यासारखे आहेत. त्यांच्या मनातील विचार अतिशय सुंदर शब्दांत त्यांनी गुंफले आहेत. ती त्यांची कविता अतिशय सुंदर आहे. त्या काव्याचे शब्द आहेत -

तोमार सोनार थालाय साजाण आज दुखेर अश्रुधार !

ह्या त्यांच्या बंगाली काव्यात ते म्हणतात, मातेनेच दिलेल्या वस्तूतून मातेलाच अर्पण करण्यात काय अर्थ आहे? हे, गंगानदीत उभे राहून तिच्याच पाण्याने

गंगामय्येची पूजा करणे, वा, फुलवातीने अग्नीची पूजा करण्यासारखे आहे. पूजा करावयाचीच झाले तर स्वत:चे असे काहीतरी असावे. आणि स्वत:चे असे कवी शोधायला जातात तेव्हा त्यांना निराश व्हावे लागते. त्यांच्या लक्षात असं येतं की जे आपल्यापाशी आहे ते दुसऱ्याचेच आहे. माझे स्वत:चे असे काही नाही. माझी स्वत:ची अशी जी काही कमाई आहे, ते केवळ दु:ख, केवळ दु:ख हीच आपली कमाई, ह्या विचाराने त्यांचे मन व्याकुळ झाले. आणि त्यांच्या डोळ्यांत पश्चात्तापाने अश्रू उभे राहिले. आणि त्यातच त्यांच्या मनात विचार आला हे पश्चात्तापाचे अश्रू, हे उपरतीचे अश्रू, हीच आपली कमाई आहे. ह्या अश्रूंनीच जर पूजा केली तर? त्रैलोक्यातील वैभव तिच्या चरणी लोळत असले तरी हे माझ्या भक्तीचे अश्रू आगळेच असल्याने माता तिचा नक्कीच स्वीकार करील.

अलीकडेच झालेल्या टी.व्ही. वरील गोट्या या मालिकेचे शीर्षकगीत किती समर्पक होते. बीज देखील रुजण्यासाठी त्याला ओलावा लागतो त्याखेरीज ते रुजत नाही, पूर्णपणे वाढत नाही. मग हाडामांसाचा गोळा जर 'माणूस' म्हणून रुजायचा, वाढायचा असेल तर त्याला सुद्धा मायेचा ओलावा, आपुलकी, प्रेम, जिव्हाळा आवश्यक असतो. माई दादारूपी असा ओलावा जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंतचे गोट्याचे जीवन कसे भरकटत जात असते. आणि तदनंतर त्याच गोट्याचे एका आदर्श, हुशार, समंजस मुलात कसे रूपांतर होते. त्याला भेटलेल्या दादा व माईमध्ये आईचीच आपुलकी नव्हती काय?

ह्या अशा आईसंबंधीच्या अनेकविध गोष्टी ऐकल्या की मग प्रश्न उभा राहतो काय असावं आई म्हणजे नक्की?

त्यागातून झालेली निर्मिती, निर्मिती नंतरचा तो आनंद, त्याच आनंदातून पुढे जोपासनेची जबाबदारी, व आपल्या आनंदाला आपल्यात आपल्याप्रमाणे सामावून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न. निर्मीतीचा आनंद हा प्रत्येक निर्मात्याला होत असतो. त्या निर्मितीमागे असते ती त्याच्या त्यागाची पार्श्वभूमी. मग त्या आनंदाचे स्वरूप आपण आपल्या घरासमोर लावलेल्या झाडाला फूल येण्यापुरते मर्यादित असो वा मनुष्य निर्मीतीचा अमर्याद असा आनंद असो. ह्या निर्मितीच्या वेळी भोगाव्या लागणाऱ्या जर अधिक यातना असतील तर कदाचित निर्मीतीचा आनंद अधिक असू शकतो. (आणि म्हणूनच कदाचित आईचे आपल्या लंगड्या, लुळ्या, व्यंग असलेल्या अशा मुलावर अधिक प्रेम असावे. अर्थात त्याचं दुसरं कारण देखील असू शकतं, आणि ते म्हणजे समाज अशा मुलांना पटकन स्वीकारीत नाही.)

प्रत्येक निर्मात्याला काळजी असते की आपण निर्माण केलेल्या गोष्टीची, ती वस्तू, ती गोष्ट जपण्याची, शाबूत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न तो करीत असतो. आणि एक हुशार संस्कारित माता आपल्या पाल्यावर देखील संस्कार करण्याचा प्रयत्न करीत असते. जेणे करून आपले मूल ह्या समाजात समर्थपणे जगण्यास लायक ठरेल, एक आदर्श म्हणून इतरजण त्याच्याकडे बघतील व तोही ह्या दैनंदिन जीवनातील घडामोडींना सहज समर्थपणे तोंड देऊ शकेल.

आपलं मूल मोठ्ठं व्हावं, जगतात त्याने आपलं व आपल्या घराण्याचं नाव काढावं असे प्रत्येक आईला वाटत असतं. पण प्रत्यक्षात ज्या वेळी आपण व्यवहारात बघतो, त्या वेळेस जगतात नाव कमावण्याचं सोडा, पण एखाद्या क्षेत्रात देखील नावलौकिक कमावलेली मुलं हाताच्या बोटावर मोजण्याएवढी असतात. एकीकडे प्रत्येक आईला आपल्या मुलाबद्दल वाटत असणारी भावना, व प्रत्यक्षातली ही परिस्थिती हे दोन्ही पाहिल्यावर मनात विचार येतो हे असं का व्हावं? वस्तुत: जे आईला वाटत असते त्यादृष्टीने ती प्रयत्न देखील करत असते, तरीसुद्धा ते मूल आदर्शवत का होत नाही हे पाहण्यापूर्वी खालील गोष्टींचा विचार करणे आवश्यक ठरेल.

भले आईच्या मनात कितीही असो पण ती परिस्थितीने बांधलेली असते. या परिस्थितीत तिची कौटुंबिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती, सभोवतालची परिस्थिती इत्यादी गोष्टींचा विचार करणे आवश्यक ठरते. मग भले त्या मातेची इच्छा असेल की आपल्या मुलाने इंजीनियर व्हावे, पण तिची कौटुंबिक परिस्थितीच नसेल तर काय करणार? सर्व परिस्थितीवर मात करून वर येणारे मूल हे जात्याच हुशार असावं लागतं.

जी गोष्ट कौटुंबिक परिस्थितीची तीच सभोवतालच्या परिस्थितीची. भले कौटुंबिक वातावरण, घरातले वातावरण खूप चांगले असेल, पण जेथे राहतात तेथील, त्या सभोवतालचे वातावरण, त्या मुलाचे मित्र, त्याचे सोबती, त्याची संगत कोणाबरोबर आहे, ह्यावर देखील अवलंबून असते. आणि त्यामुळेच आई - वडील नेहमी आपल्या मुलाचे मित्र कोण आहेत, त्यांचे वागणे कसे आहे हे बघत असतात. कारण मित्रांच्या वाईट सवयी त्याच्याकडून पटकन उचलल्या जाण्याची शक्यता असते.

कौटुंबिक परिस्थितीत आर्थिक परिस्थितीचा विचार वर केला आहेच. थोडक्यात आई - वडिलांची काहीही इच्छा असो अथंरूण पाहून पाय पसरावे लागतात हे मात्र खरे!

ही झाली सभोवतालची, कौटुंबिक व आर्थिक परिस्थितीची माहिती, पण

ह्या बरोबरच किंबहुना त्यापेक्षाही आधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलावर संस्कार होत असतात ते त्याच्या मातेच्या वडिलांच्या परिस्थितीचे व ते दोघं आपल्या मुलाला वाढवत असलेल्या पद्धतीचे. तुकारामांनी म्हटलेल्या अभंगाची इथे परत एकदा आठवण होते.

शुद्ध बीजापोटी ! फळे रसाळ गोमटी ।।

आई - वडिलांच्या सवयी, त्यांची वागण्याची पद्धत, मुलांशी बोलण्याची पद्धत ह्या सर्वांचा परिणाम त्या मुलावर कळत - नकळत होत असतो.

बहुसंख्य घरांत दिसत असणारे, त्यातल्या त्यात खालच्या वर्गातील घरात दिसत असणारे चित्र. वडील रात्री घरात पिऊन धिंगाणा घालतात, नाही - नाही ते उलट - सुलट बोलत असतात, वगैरे प्रकाराची उदाहरणे ह्याच प्रकारच्या परिस्थितीत मोडता येतील. ह्या अशा प्रकारात मुलाला केवळ त्याच्या आई - वडिलांची सतत चालणारी भांडणेच आठवत राहतात. कारण आई - वडिलांचा सुसंवाद असा त्याला क्वचितच पाहायला मिळत असतो. कालांतराने त्याची आई - वडिलांबद्दल तेढ निर्माण होऊ लागते. आणि मग असा तो मोठेपणी भरकटत जाण्याची शक्यता असते. कारण त्याच्या मनावर तसेच संस्कार होत आलेले असतात.

मुलगा आदर्श होण्याला ज्याप्रमाणे सभोवतालची, कौटुंबिक, आर्थिक, परिस्थिती कारणीभूत असते, त्याचप्रमाणे आई - वडिलांची परिस्थिती, त्यांची वागण्याची पद्धत ह्यावर देखील अवलंबून असते. हे आपण वर पाहिलेच आहे. पण त्याशिवाय ते अवलंबून असते, ते त्यांच्यादृष्टीने आदर्श म्हणजे काय ? त्यांची आदर्शाची कल्पना काय ह्यावर देखील अवलंबून असते. काही आई - वडील अल्पसंतुष्ट असतात. आपल्यासारखेच आपल्या मुलाने सरकारी नोकरीत चिकटावे, वा आपलाच धंदा पुढे रेटावा, आणि आपल्यासारखेच त्याने थोडक्यात मिळणाऱ्या वाढींवर समाधान मानावे, अशी त्यांची विचारधारणा असेल व त्यादृष्टीने ते आपल्या मुलाची वाढ करीत असतील, तर त्या मुलाने तरी मोठी झेप कशी घ्यावी ? कसे धजावे त्याचे मन ? आणि तो देखील आपल्या वडिलांप्रमाणेच जमा - खर्चाची तोंडमिळवणी करत दिवस कंठू लागतो. आपल्यासारखे आपल्या मुलाचे जीवन हालअपेष्टा काढण्यात जाऊ नये असे त्यांना वाटतच नसावे मुळी. अशी असते त्यांची कृती. किंबहुना असा विचार देखील त्यांच्या मनात शिवत नसावा की आपल्या मुलाने कुणीतरी मोठ्ठे व्हावे, बनावे, तर माझ्यासारखीच त्याने देखील सरकारी नोकरी करावी व त्यातच त्यांनी धन्यता मानावी, हीच मुळी त्यांची विचार धारणा.

आपण बघतोच विणकराचा मुलगा, चांभाराचा मुलगा, हजामाचा मुलगा, कुंभार, शेतकरी इत्यादींची मुलं त्यांच्या हाताशी आली म्हणजे त्यातच ती धन्यता मानतात आणि वर फुशारकीने सांगतात माझा मुलगा माझ्यापेक्षा देखील व्यवस्थित केस कापतो, चप्पल बनवतो वा मडकी बनवतो. तिथे त्याला त्यातच धन्यता वाटत असते. माझ्यावर आयुष्यभर लोकांचे केस कापत राहण्याची वेळ आली तशी मी माझ्या मुलावर येऊ देणार नाही, अशी जिद्द, तळमळ जोपर्यंत त्यांच्या मनात येणार नाही, तोपर्यंत काही उपयोग नाही. माझ्या मुलाने माझ्यासारखेच वा माझ्यापेक्षा देखील सरस लोकांचे केस कापावेत हाच जर आदर्श असेल तर गरिबीचा व त्याला मिळू न शकणाऱ्या (काय करायचे आहे ते शिकून) शिक्षणाचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. अखेर तो मुलगा आपल्या बापाप्रमाणेच त्याचाच व्यवसाय चालवत राहतो व त्यातच तो धन्यता मानू लागतो.

हे सांगत असताना आठवण होते ती एका तमाशात नाचणाऱ्या बाईची. त्या बाईची एकच इच्छा असते, की माझ्यासारखे माझ्या मुलीने लोकांसमोर नाचून त्यांचे मन रिझवण्यात आयुष्य घालवू नये. तिने भरपूर शिकावे. व मोठ्ठे व्हावे. हे तिच्या मनातले विचार त्याप्रमाणे तिची ती धडपड, जिद्द खरोखरच वाखाणण्यासारखे आहे.

थोडक्यात आपल्या मुलाने मोठ्ठे व्हावे, आदर्श जीवन जगावे. ह्याला परिस्थिती जरी कारणीभूत असली तरी ते आई - वडिलांच्या दृष्टिकोनावर देखील अवलंबून असते.

त्याचबरोबर आणखीन एका गोष्टीवर देखील अवलंबून असते ते म्हणजे स्वत: आईवर झालेले संस्कार, तिचे आदर्श, तिच्या मनावरील पगडा इत्यादी. एखाद्या आईने ठरवले की आपले आयुष्य तर फुकट गेले पण तसे आपल्या मुलाचे जाता कामा नये. आणि त्यादृष्टीने ती प्रयत्न करू लागली, तरी देखील तिच्यावर झालेले तिच्या लहानपणापासूनचे भले - बुरे संस्कार व त्याचे परिणाम हे अधून मधून कळत नकळत व्यक्त होत राहतातच. त्याचप्रमाणे ते अवलंबून असते ते तिच्या स्वत:च्या कुवतीवर देखील.

ह्या सगळ्या गोष्टींबरोबरच मनात आणखीन एक विचार येऊन जातो की, स्त्रीला बजावाव्या लागणाऱ्या इतर अनेक भूमिकांपैकी 'आई' ही एक होय. नुसतीच आईची भूमिका तिला बजवायची नसते. आईबरोबरच ती इतर देखील काही असते. तिला इतर अन्य भूमिका देखील बजावायच्या असतात. ती कुणाची पत्नी असते, कुणाची मुलगी, कुणाची बहीण इत्यादी असते. तिला

जसे आपल्या मुलाची आई म्हणून भूमिका बजावायची असते. तशाच अन्य भूमिका देखील बजावायच्या असतात. आणि ते देखील समर्थपणे. समाजाची तिच्याकडून नुसत्या आदर्श मातेची अपेक्षा नसते, तर त्या एका आदर्शत्वाबरोबरच तिने आदर्श पत्नी, मुलगी इत्यादी असावे अशी देखील अपेक्षा असते. पण 'स्त्री' जेव्हा 'आई' ह्या नात्याने जगते तेव्हाच ती तिच्याकडे चालत आलेल्या इतर भूमिका देखील सहजपणे पार पाडू शकते. आणि तरी देखील तिचे मन मात्र 'आई' ह्या भूमिकेशीच घुटमळत राहते.

हे सांगत असताना गोष्ट आठवते ती इरावती कर्व्यांच्या 'परिपूर्ती' ह्या गोष्टीची. त्यांना एका ठिकाणी व्याख्यान देण्यासाठी बोलावलेले असते. त्या ठिकाणी त्यांचा परिचय करून देण्यासाठी कार्यकर्ता उभा राहतो, आणि परिचय करून देण्यास सुरुवात करतो. त्यांचे वैयक्तिक गुणवर्णन झाल्यावर तो सांगू लागतो,

''अशा ह्या गुणी वक्त्या महर्षी आण्णा कर्वे ह्यांच्या सूनबाई, रघुनाथ कर्वे यांच्या की ज्यांनी लोकसंख्येवर आळा घालण्यासाठी अपार मेहनत घेतली - त्यांची वहिनी व दिनकर कर्व्यांची पत्नी इत्यादी इत्यादी.''

ह्या परिचयाच्या कार्यक्रमानंतर त्यांच्या भाषणाचा कार्यक्रम होतो. त्यानंतर त्या घरी परत येतात. पण मनात रुखरुख असते ती ही की, मगाशी जो माझ्या परिचयाचा कार्यक्रम झाला तो पूर्ण झाला नाही, काहीतरी अपुरे राहिले आहे असे वाटत असते.

त्यानंतर ४ - ५ दिवसांनी त्या रस्त्याने कुठेतरी चालल्या होत्या. इतक्यात कोपऱ्यावर उभ्या असलेल्या मुलांच्या घोळक्यातून आवाज आला,

''अरे ऽऽ एऽ शू ती बघा आपल्या वर्गातील कर्व्यांची आई....''

ते शब्द इरावतीबाईंच्या कानावर पडले मात्र, कृतकृत्य झाल्यासारखे वाटले आणि त्या दिवशी अपूर्ण राहिलेला परिचयाचा कार्यक्रम आज पूर्ण झाल्यासारखा वाटला.

आई कुणाची तरी कुणीतरी असते. त्याचबरोबर ती समाजाची देखील एक घटक असते. तिला शेजाऱ्यांशी, मैत्रिणींशी, ओळखीच्यांशी तसेच स्वतःच्या व पतीच्या नातेवाइकांशी, इत्यादींशी सुद्धा संबंध ठेवायचे असतात व वृद्धिंगत करायचे असतात. मला एक विचित्र प्रसंग नेहमी सगळ्यांच्याकडेच पाहावयाला मिळतो, तो म्हणजे पतीकडील नातेवाईक तिला, तिचे लग्न झाल्यावर समजतात कोण, कुठले ते, पण त्या सर्वांचं स्मरण व आकलन हे तिच्या पतीपेक्षा तिला अधिक स्पष्ट असते, कारण प्रत्येक घरात ''अग कोण गं ते माझे

मावस काका ? कुठे असतात गं हल्ली ?'' असे पती आपल्या पत्नीस विचारीत असतात. हे व असं दृश्य प्रत्येक घरात कमी अधिक प्रमाणात पाहावयाला मिळत असते. असं तिच्या स्मरणात असल्याचं कारण म्हणजे कदाचित ती पूर्णपणे समरस झालेली असते हे असावेसे वाटते.

इतर नातेवाईक व शेजारीपाजारी इत्यादींबरोबरच हल्ली एक नवे नाते निर्माण झाले आहे व ते म्हणजे 'नोकरी'. आज नोकरी हा एक वेगळा विशेष असा अविभाज्य घटक झाला आहे प्रत्येक स्त्रीच्या जीवनात! कुणी म्हणतात नोकरी ही काळाची गरज आहे. कुणी म्हणतात आजकालच्या निष्कारण व फाजील गरजांमुळे नोकरी आवश्यक झाली आहे. नोकरी ही आवश्यक आहे वा नाही हा संपूर्णपणे स्वतंत्र विषय आहे. नोकरी करण्याचे फायदे तोटे दोन्ही आहेत. नोकरीमुळे काही गोष्टी चांगल्या होतात. तर काही वाईट. नोकरीमुळे दिवसाचा बराचसा वेळ तिला बाहेर घालवावा लागतो. आणि मग साहजिकच तिची घराविषयीची आस्था कळत - नकळत कमी होऊ लागते. आपल्या मागे घरावर, मुलांवर देखरेख करण्यासाठी नोकरमाणसांची नेमणूक करते. आणि मग कदाचित असं होऊ शकतं की मुलाच्या दृष्टीने घराबद्दलची आपुलकी कमी झाली आहे. ही झाली दिवसाची आई कामावर गेली असतानाची परिस्थिती! पण आई घरी आल्यावर देखील ह्यात फार फरक पडतो असं नाही. नोकरीनिमित्त आई दूर गेलेली असते. तिला संध्याकाळी घरी परतण्यास उशीर लागतो. थकून भागून आलेल्या आपल्या जवळ शंका - समाधानासाठी वा विरंगुळ्यासाठी वा आईला जम्माडी गंमत सांगण्यासाठी गेलेल्या मुलांना अनुकूल प्रतिसाद मिळतोच असं नाही. आणि मग त्यांच्यातील गैरसमज, दुरावा वाढत जातो. आणि मग मुलाला आपलं असं कुणी नाही असं वाटू लागतं. मुलाची ही मानसिक अवस्था व त्या अवस्थेची जाण माता - पित्यांना जेव्हा होते, तेव्हा खूप उशीर झालेला असतो. पुरुषाच्या बरोबरीने कमावणाऱ्या स्त्रीचा 'स्व' वाढत जातो, तो तिच्या नकळत! आणि मग कारण नसताना खटके उडत जातात, एवढ्याशा तेवढ्याशा गोष्टींवरून. योग्य ठिकाणी व योग्य वेळी जर समझोता, सामोपचार झाला नाही, तर त्याची परिणती कायम - स्वरूपाच्या दुराव्यात होऊ शकते. ह्या समोर घडत असलेल्या घटनांचे पडसाद मग त्या छोट्याशा मुलावर उमटू लागतात. आणि अशातूनच मग त्या लहानग्याचे भवितव्य अंधकारमय ठरू शकते.

म्हणजे मग असं म्हणायचं का की स्त्रियांनी त्यांच्या 'स्व'त्वाला कायमची तिलांजली द्यावी? आपल्या मुलांकरिता तिने आपल्या स्वतःचा विकास करून

घेऊ नये ?

असं मात्र मुळीच म्हणता येणार नाही. खरं म्हणजे, स्त्रीची नोकरी ही आज काही प्रमाणात काळाची गरज आहे. हे मान्य करावेच लागेल. एकीकडे मानवाच्या गरजा काळानुरूप वाढत आहेत. विभक्त कुटुंब पद्धती झपाट्याने विकास पावत आहे. आणि 'गरज' ह्या शब्दाचा अर्थच बदलत चालला आहे. आपल्या पाल्याने ह्या स्पर्धेच्या युगात टिकायचे झाल्यास त्यांना उत्तमोत्तम मार्गदर्शनपर सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक ठरत आहे. तसे केले तरच त्यांचे भवितव्य उज्ज्वल आहे, हे आई-वडिलांना त्यांच्या डोळ्यांसमोर दिसत आहे. एखाद्या आईने आपल्या मुलावर संस्कार करावयाचे, त्याच्यावर लक्ष ठेवायचे, वगैरे अशा कारणाकरिता करीत असलेली नोकरी सोडली. आणि मग मोठेपणी मुलगा आईला म्हणाला, "त्या वेळी तू नोकरी करून आपल्याला चार पैसे अधिक मिळवता आले असते. तर मला आजच्या या गतिमान युगात अधिक समर्थपणे, अधिक ठामपणे उभे राहता आले असते" तर काय घेता ! असं मुलं उद्या म्हणणारच नाहीत असं नाही.

मग स्वभाविकपणे आंज कामावर जाणाऱ्या आईस प्रश्न पडतो की, अशा परिस्थितीत आम्ही काय करावे ? आठ - दहा तास घराबाहेर राहून नंतर परत घरात येऊन मुलांच्या कलाकलाने एकीकडे काम करणे हे एखाद दिवशी ठीक आहे. पण रोज रोज शक्य आहे काय ?

आजची माता ही एका विचित्र अवस्थेत आहे. एकीकडे परिस्थिती, तिने आज नोकरी करणे आवश्यक असल्याचे सांगत आहे. तर दुसरीकडे परंपरागत चालत आलेला पुरुषी अहं सोडायला आजचा पुरुष अजूनही म्हणावा तितका तयार नाही. स्त्रीने नोकरी करण्याची आवश्यकता जशी त्याला भासत आहे, तसेच आपणही आपला अहं काही प्रमाणात कमी करून, काही प्रमाणात तरी का होईना पण मदत केली पाहिजे, ही जाणीव त्याला निर्माण व्हायला लागली आहे. काही प्रमाणात त्या जाणिवेप्रमाणे तो मदत देखील करू लागला आहे. पूर्वीच्या पुरुषांकडे पाहता आजचा पुरुष अधिक मदत करतो, असे दिसून येते. मदतीकडे आज पहिले पाऊल पडले आहे हे मान्य करावे लागेल. पण असे मान्य करताना ही गोष्ट देखील कबूल करावी लागेल की ही प्रगती अजून पहिल्या पावलापर्यंतच मर्यादित आहे. आणि त्यामुळेच आजची माता एका विचित्र कोंडीत सापडल्यासारखी वाटते. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे ती सासू-सासऱ्यांपासून वेगळी राहते. मुलांना सांभाळायला कोणाकडे ठेवायचा हा प्रश्न त्यातून उद्‌भवलेला असून, ज्या माता आपल्या मुलांना त्यांच्या

आजी - आजोबांकडे, सासू - सासऱ्यांकडे ठेवतात त्या ठिकाणी हे काम काहीशा नाराजीनेच ते स्वीकारलं असल्याचे दिसतं. त्याच्या अनेक कारणांपैकी एक कारण संभवते, ते म्हणजे आजपर्यंत त्यांनी त्यांच्या मुलांना लहानाचं मोठं केलं, वाढवलं, आता त्यांना विश्रांतीच्या वेळी ही जबाबदारी आणि पुन्हा नव्याने सर्व काही स्वीकारण्यास तयार नसावे. त्यात त्यांचीही चूक म्हणता येत नाही. अर्थात हा प्रश्न पुढील पिढीला येऊ नये, कारण पुढल्या पिढीतील सुनेने नोकरी केलेली असल्याने तिने तिच्या सासूपणाच्या काळात आपल्या नातवाला व्यवस्थितपणे सांभाळावे. कारण तिच्या तरुणपणात तिची मुले सासूने सांभाळलेली असल्याने, आपण आपल्या सासूपणाच्या काळात नातवांना सांभाळले पाहिजे ही जाणीव तिला झालेली असेल. आणि ते तिला तिच्या तरुणपणाच्या काळात करावे न लागल्याने ते ती आनंदाने स्वीकारेल.

ही झाली आणखी काही वर्षांनंतरची गोष्ट. पण आज.... आजची माता मात्र विचित्र परिस्थितीत अडकली आहे, हे मान्य करावेच लागेल. आणि हे मान्य करताना ज्या वेळी आपण तिच्या मनात डोकावून बघण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आजची माता ही पूर्वापार चालत आलेल्या मातेपेक्षा वेगळी आहे काय ह्याचे उत्तर मिळते.

आजच्या मातेवर चारही बाजूने ताण पडत आहे. एकीकडे पैशाचा पुरवठा व्यवस्थित राहावा म्हणून नोकरी करावी लागत आहे. हे करावं लागत असताना मदतीची जेवढी अपेक्षा आहे, तेवढी तिला पतीकडून मिळत नाही. नोकरी करते म्हणजे काही विशेष करीत नाही, असं म्हणणाऱ्या सासूबाई देखील मदतीचा हात आखडता घेताना दिसतात. म्हणजेच एकीकडे पूर्वपरंपरापासून तिच्या वाटेला आलेली कामे आहेत, त्यात कुठेही कमतरता नाही आणि दुसरीकडे नोकरीची जबाबदारी मात्र वाढलेली आहे. नाही म्हणायला, धुलाई मशीन, मिक्सर, ग्राईंडर, वगैरे आधुनिक यांत्रिक उपकरणे तिला मदत करण्यास मात्र सज्ज आहेत.

आज पडलेल्या नोकरीच्या जबाबदारीमुळे तिने पार पाडावयाच्या मातृत्वाच्या भूमिकेत थोडा फरक पडत चालला आहे. मुलांच्या, आईकडून असलेल्या अपेक्षित सर्वच गोष्टींचं समाधान करण्यास ती समर्थ ठरत आहे असं नाही. मुलांकरता कितीही करायचं ठरवलं तरी आजच्या परिस्थितीमुळे, दिवसभराच्या ओढाताणीमुळे आणि ह्या धावपळीमुळे, तिला ते शक्य होत नसावे. मग भले तिच्या मनात असो वा नसो !

साधारण १२ - १३ वर्षांपूर्वी आमच्या शेजारची बाई, तिच्या वर्षभराच्या

मुलीला आमच्याकडे सोडून कामावर जात असे. प्रसंग आजदेखील डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा राहतो. चिरंतन लक्षात राहावा असाच प्रसंग आहे मुळी तो! जो आज घराघरात रोज घडत आहे. सकाळी जेव्हा ती आमच्याकडे मुलीला सोडत असे तेव्हा रोज त्या मुलीचा रडण्याचा कार्यक्रम ठरलेला. मग रोज तिची समजूत काढायची वा तिला चुकवून निघून जायचे. कालांतराने त्या छोट्याशा पोरीला हे कळलं असावं की, आपण कितीही रडलो, ओरडलो तरी आई जायची ती जातेच. ती जायची काही थांबत नाही. आणि मग त्या रडून निरोप देण्याच्या प्रसंगाचं रूपांतर होतं, हसत, टा ऽ ऽ टा करत, वा आईला पापा देऊन! आई देखील ह्या खूश झालेल्या व स्मित वदने निरोप देणाऱ्या बाळाकडे पाहून 'संध्याकाळी येताना तुझ्यासाठी खाऊ आणीन हं!' हे सांगावयास विसरत नसे. आणि अशा रीतीने रडारडीने होणाऱ्या निरोपाचा होणारा कार्यक्रम आता हसतमुखाने होऊ लागला. खरोखर - आई व बाळ दोघंही हसून एकमेकांना निरोप देत असतील का?

हास्यवदने परस्परांना निरोप हा काळाचा, परिस्थितीचा विजय होता तर त्या मातेतील मातृत्वाचा पराजय! अन्यथा कुठले १ - १॥ वर्षाचे मूल आपल्या आईला हसत हसत निरोप देईल? दुर्दैवाने आज प्रत्येक घरात, प्रत्येक सकाळी आपल्याला हा प्रसंग पाहावा लागत आहे.

आजची आई त्यावर देखील तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत आहे. अखेर ती त्या मुलाची आई असते ना! ह्या परिस्थितीवरती देखील मात करण्याचा ती आपल्यापरीने प्रयत्न करीत असते. त्यातल्या त्यात ती त्या लहानग्याच्या कलेने वागायचा प्रयत्न करीत असते. मग कधी ती त्याच्या लहरीप्रमाणे कामावर उशिरा जाईल, कधी कामावरून लवकर घरी परतेल, तर कधी जाणारच नाही, इत्यादी. आणि खरं सांगायचं म्हणजे, जरी ती कामावर गेली तरी तिचं बऱ्याच वेळा, त्यातल्या त्यात बाळाच्या आनंदाच्या प्रसंगी वा ते आजारी वगैरे असताना लक्ष घराकडेच, त्या बाळाकडेच असते.

आजच्या आईची, विशेषत: नोकरी करणाऱ्या, स्थिती विचित्र आहे, ते आणखी एका गोष्टीमुळे! एकीकडे आजच्या आधुनिक युगात जगण्यासाठी आवश्यक तेवढा पैशाचा पुरवठा करण्यासाठी तिच्यावर नोकरीचा अतिरिक्त भार पडला आहे. तर दुसरीकडे आजपर्यंत चालत आलेले रीतीरिवाज, कुळाचार पद्धती या गोष्टींकडे दुर्लक्ष केल्याचा रोष पत्करावा लागत आहे व ते सर्व रीतीरिवाज सांभाळावे लागत आहेत. आणि हे करत असताना मुलाचे योग्य रीतीने पालन पोषण करण्याची जबाबदारीत देखील कुठे सूट नाही. आणि

ती असावी अशी तिची अपेक्षा देखील नसावी. त्यामुळे आजच्या आईची प्रचंड अशी ओढाताण होत आहे. आणि ही अशा प्रकारची ओढाताण केवळ आईच सहन करू शकेल आणि मला वाटतं ह्या सर्व, त्या मातेच्या ओढाताणीमागे स्वत:चे जीवन अधिक सहज, सुलभ व सुखकारक व्हावे असा उद्देश असेल, पण त्याच बरोबर आपल्या मुलांना कर्तृत्ववान करण्यासाठी कितीही कष्ट उपसण्याची तिची तयारी देखील असेल. हे सर्व कष्ट उपसत असताना तिच्या डोळ्यांसमोर खऱ्या अर्थाने तिची मोठी झालेली मुलं तिला दिसत असतील.

हे पाहत असताना आपल्याला असं कबूल करावं लागतं की, काळाच्या ओघात आईच्या आणि मुलांच्या गाठीभेटीं मध्ये बंधनं आली असतील, कदाचित काळाच्या या गतिमान जीवनामध्ये मुलांकरता तेवढा वेळ देता येत नसेल, पण मुलांवर करायच्या प्रेमाचे स्वरूप, राग लोभाची समीकरणं पद्धती बदलत असल्या, तरी सुसंस्कारित करण्याची जिद्द, एकूण मुलांकडची तिची ओढ, तीच आज कायम आहे, जी आजतागायत चालत आली आहे. नीट बारकाइने पाहिलं तर लक्षात असं येतं की, काळाच्या ओघात जीवनमूल्यांचा फरक झाला असेल, पण त्या दोघांच्या परस्पराकर्षणात तीळमात्र बदल झाला नसावा. आणि मग खात्री वाटते की जग भले एकविसाव्या शतकाकडे जावो वा आणखी पुढे, पण मातेच्या पुत्रप्रेमात कालत्रयी बदल पडणार नाही.

शेवटाकडे वळताना भगिनी निवेदिता काय म्हणतात हे पाहणे मोठे उद्बोधक ठरेल. नैसर्गिक प्रेम व त्याग ह्या दोन गुणांमुळे आध्यात्मिक जीवनात स्त्रीचे स्थान आपोआपच उंचावते. पत्नीप्रेम हे पतीच्या प्रेमावर थोडेफार तरी अवलंबून असते, पण आईचे प्रेम मुलाच्या मागोमाग नरकातही आनंदाने उडी घेण्यास सज्ज असते. मातृत्वात मायेची पाखर आहे, कळकळीचा आशीर्वाद आहे, सातत्य आहे, संरक्षण आहे, अथांग प्रेम आणि अवीट असा गोडवा आहे. न तुटणारी बंधने आहेत. आणि पावित्र्य आहे. असं सांगून त्या पुढे म्हणतात, "मातेच्या प्रेमात एक दिव्य अनुभूती आहे. स्वामित्वाचा त्यात अंश देखील नाही. या पवित्र दीप्तीत न्हाऊन कृतज्ञ बुद्धीने आयुष्य जगावे. एवढेच मनुष्य करू शकतो."

पंचांगात मातृदिन असा उल्लेख श्रावण अमावस्येच्या दिवसापुढे पिठोरी अमावस्येला केलेला आढळतो. हा मातृदिन प्रामुख्याने अदिती व वामन या संदर्भात आहे. अदितीने बलीच्या दैत्य साम्राज्यापासून देवांची मुक्तता करण्यासाठी पयोव्रत केले आणि त्याने संतुष्ट होऊन भगवान नारायणाने तिच्या पोटी वामनाच्या रूपात जन्म घेतला. अशी ती कथा आहे. या मातृदिनाच्या

निमित्ताने प्रत्येक पुत्राने आपापल्या हयात असलेल्या मातेचे पूजन केले, तर तो एक नवीन चांगला पायंडा पाडल्या सारखे होईल. त्यामुळे पुत्राच्या अंत:करणातील मातृभक्तीच्या उमाळ्याला काहीसे दृष्ट व्यक्त स्वरूप आलेले इतरांना दिसेल.

अमेरिकेत 'मातृदिन' साजरा होतो. प्रतिवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी 'मदर्स डे' साजरा करण्यात येतो. हा अधिकृत सुट्टीचा दिवस आहे. केवळ अमेरिकेतच नव्हे, तर ख्रिस्ती प्रार्थना मंदिरांतून हा मातृदिन सर्वत्र पाळला जातो. फार प्राचीन काळी 'गॅलेक्सीया' या नावाचा सणही मातेविषयी आदरभाव व्यक्त करण्यासाठी साजरा केला जाई.

भारतात प्रतिवर्षी २२ फेब्रुवारीला मातृदिन पाळण्यात यावा असे अखिल भारतीय महिला परिषदेच्या कार्यकारिणीने ठरवले आहे. (फेब्रुवारी १९६९) ४४ साली म. गांधींच्या पत्नी कस्तुरबा यांचे याच दिवशी निधन झाले. म्हणून हा दिवस! जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।

■

BVBK-0402772

# परिशिष्ट

'आई' 'माता' हे शब्द उच्चारले की लगेचच आपल्या डोळ्यांसमोर विशिष्ट प्रकारची मूर्ती उभी राहते. ह्या आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहिलेल्या मूर्तीमधे मातृत्वाचे सर्व सार असते. त्यात आपल्याला मातेची, मुलाला मोठं करण्याची तळमळ, कळकळ, दिसत असते. तिने केलेला त्याग दिसत असतो. प्रेम वात्सल्य करुणा म्हणजे काय हे त्या मूर्तीकडे पाहिल्यावर सहज लक्षात येते. मनापासून तिची चाललेली धडपड दिसत असते. अनेकविध रूपांनी नटलेली अशी मूर्ती आपल्या डोळ्यांसमोर लगेचच उभी राहते.

'माता' हे व्यक्तीवाचक नाम झालं, तर 'मातृत्व' हा स्वभाव आहे. आणि म्हणूनच आपण कित्येकांना 'अमुक एका व्यक्तीने त्याला मातेसारखे वाढवले' असे म्हणतो. प्रत्यक्षात ती व्यक्ती माता नसते, पण त्या व्यक्तींचा त्याग व इतर गुण हे मातेसमान असतात. त्यांचे प्रेम, त्यांचे औदार्य, निष्ठा, त्याग, तपस्या, बलिदान ह्या सर्व गोष्टी एखादी माता आपल्या मुलाकरता करील तद्वत असतात म्हणूनच त्याला, त्या व्यक्तीला, कृतीला व त्या भूमिकेला आपण मातेसमान मानतो. आणि त्यांना देखील माता म्हणूनच संबोधतो.

ह्या प्रकारामध्ये अनेक प्रकारच्या माता येतात जसे की

गोमाता

गंगामाता,

मातृभाषा

भारतमाता इत्यादी.

**गोमाता** – अतिप्राचीन काळापासून मानवाच्या जीवनास गायीला महत्त्व आलेले आहे. वन्य अवस्थेत ज्यावेळी मनुष्य मांसावर उपजीविका करून राहत असे, त्यावेळी सहज सुलभतेने उपलब्ध व्हावे म्हणून कुत्र्यापाठोपाठ माणसाने गायीला माणसाळवले असावे असे मानले जाते. पुढे धार्मिक कार्यात, कृषीप्रधान देशात शेतीकरता आवश्यक बैलामुळे, मलमूत्राने जमीनीचा कस वाढत असल्याने,

दुधाच्या रूपात प्रथिनयुक्त अन्नाचा पुरवठा होत असल्याने, गायीचे महत्त्व उत्तरोत्तर वाढतच गेले. 'गौ' कुलात गाईखेरीज शेळ्या, मेंढ्या, गवा, गयाळ, बानटींग, याक तसेच बिसोंटनिव, महीष (म्हैस) यांचा समावेश आहे. खरेच ह्या वर्गाचा माणसाला किती उपयोग होतो बरे! ही एवढी उपयोगिता पाहिली तर तिची आपण मातृवर्गात गणना केली आहे ते योग्यच वाटते! नाही का?

**गंगामाता** – मातेच्या ह्या क्रमावलीत आम्हा हिदूधर्मीयांच्या तसेच तमाम भारतीयांच्या श्रद्धेचा विषय म्हणजे 'गंगामाता'

ह्या गंगामातेची प्रथम आठवण होते ते सकाळी आंघोळ करताना! पाण्याचा तांब्या अंगावर उपडा करताना आपल्या मुखातून सहज उद्‌गार येतात ते 'हरहर गंगे भागीरथी' असे!

ही नदी भारतातील सर्वात मोठी नदी असून आम्हा सर्व भारतीयांना ती पवित्र नदी वाटते. ही नदी २५१० कि.मी. लांबीची असून उ. प्रदेश, बिहार, व बंगाल ह्या राज्यातून वाहते. बंगाल व बांगला देश ह्यात गंगेचे असंख्य शाखाप्रवाह होवून, जगातील सर्वात विर्स्तीर्ण ५८७५२ चौ. कि.मी. क्षेत्रफळाचा त्रिभूज प्रदेश तयार झाला आहे.

गंगेइतके धार्मिक महत्त्व जगातील इतर दुसऱ्या कुठल्याही नदीला नसेल. जन्मात एकदा तरी गंगास्नान घडावं अशी प्रत्येक हिंदूची इच्छा असते. मरताना सुद्धा गंगाजल तोंडात घालतात. सीलबंद बाटलीतील गंगेची पूजा, गंगाजल हातात घेवून शपथ घेणे, नवीन खोदलेल्या विहिरीत गंगाजल टाकणे, मंगलप्रसंगी गंगाजलाचा अभिषेक करणे, इत्यादी चालीरीती आहेत. गंगेचं पाणी रोगहारक व पथ्यकार असल्याची ख्याती आहे. महमद तुघलक, औरंगजेब, अकबर, नित्यनियमाने गंगाजल सेवन करीत. पंडित मदनमोहन मालवीयांनी परदेशी जाताना पुरेसे गंगाजल नेले होते. पंडित जवाहरलाल नेहरु 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या त्यांच्या ग्रंथात म्हणतात.

"भारताचे हृदयच जिने बंदिवान करून ठेवले आहे, आणि इतिहासाच्या उषःकालापासून कोटी कोटी भारतीयांना जिने आपल्याकडे आकृष्ट करून घेतले आहे, ती भारताची एकमेव श्रेष्ठ नदी. गंगा! उगमापासून मुखापर्यंतची आणि प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतची गंगेची कथा म्हणजे सभ्यता व संस्कृती साम्राज्याचा उदय व अस्त भारतीय विचारवंताना व्यग्र करून टाकणारा मनाचा शोध जीविताची परिपूर्ती, त्यातील अधिकार आणि त्याग तसेच जीवन आणि मृत्यू यांची कथा आहे."

मातेच्या सदरात ह्या सर्वांचा उल्लेख का? किंवा आपण यांनाही माता

का म्हणत असू? ह्याचा विचार करत असताना असे लक्षात येते की मातेच्या व्याख्येत ह्या प्रकारच्या माता सुद्धा मोडतात. मातेच्या अंगी असलेले त्याग, परोपरकार, दुसऱ्याकरिता झिजणे, निस्वार्थी बुद्धी वगैरे प्रकारापैकी सर्व काही गुण ह्या मातांमधे देखील आहेत.

मातृभाषा एक अशी काही चीज आहे की, जिच्याशी जगातील प्रत्येक व्यक्ती निगडीत आहे. मग त्याकरिता तिला धर्म, जात, देश, पंथ, इत्यादी पैकी कुठल्याही प्रकाराचे बंधन नाही. जगातील प्रत्येक व्यक्तीला मातृभाषा ही असतेच. ती त्याच्या जन्मापासून ते त्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्याच्या सोबत अगदी त्याच्या सावलीसारखी असते. ह्या जगतात इतरांबरोबर संवाद साधण्यासाठी माध्यम म्हणून तिचाच वापर होतो. दुसऱ्या कुठल्याही भाषेतून शिक्षण घेतलं तरी अधिक स्पष्टपणे विचार मांडण्याची क्षमता ही मातृभाषेतूनच असते. आणि म्हणूनच प्रत्येकाने माध्यमिक शिक्षण तरी आपल्या मातृभाषेतूनच घेणे आवश्यक आहे. त्यातच त्याचा सर्वार्थाने विकास होण्यास मदत होते. मातृभाषा ही त्याच्या रोमारोमात भिनलेली असते.

नाना फडणवीसांच्या गोष्टीची ह्या इथे आठवण होते. एकदा नानांच्याकडे एक माणूस येतो व तो म्हणतो, तुम्ही चतुर आहात. असे कळले. माझी मातृभाषा कोणती ते तुम्ही ओळखून दाखवा. त्या माणसाला १० - १२ भाषा अस्खलितपणे बोलता येत होत्या. त्याचे ते अनेक भाषांवरील प्रभुत्व पाहून नाना देखील क्षणभर बुचकळ्यात पडले, काही वेळ विचार करून म्हणाले "मी तुम्हाला उद्या सकाळपर्यंत सांगतो."

तो गृहस्थ रात्री झोपल्यावर नानांनी त्याच्या अंगावर पाणी शिंपडले त्याबरोबर तो गृहस्थ 'आईऽ आईऽ करीत त्याच्या मातृभाषेत ओरडला व डोळे चोळीत चोळीत जागा झाला. त्याबरोबर नाना त्याला म्हणाले " ही तुझी मातृभाषा" कोणत्याही भाषेवर व कितीही प्रभुत्व असले तरी बेसावध अवस्थेत मनुष्य मातृभाषेतच बोलतो. ती त्याच्या रोमारोमात भिनलेली असते.

खरं म्हणजे मातृभाषाच एखाद्या व्यक्तीला घडवते. दुसऱ्यांचे विचार आपल्यापर्यंत आणणे व आपले विचार दुसऱ्यांपर्यंत पोहोचवणे हे काम मातृभाषाच समर्थपणे करत असते.

**भारतामाता -** आम्हाला आमच्या पूर्वपरंपरागत सांगण्यात आले आहे की, धरती ही आमची माता आहे. ती आमच्या लहानपणी पर्वतस्तनातून दुग्धधारांप्रमाणे पाझरणारे नदीजल पाजते. मोठेपणी आमच्या गरजांप्रमाणे, आवश्यकतेप्रमाणे अन्नधान्य पुरवते. फळाफुलांची रेलचेल केवळ तिच्यामुळेच जमते. आवडणारी

फळे फुले ती देवू शकते. एकीकडे तिचे हे अनंतहस्ते देणे चालले असताना निस्वार्थ बुद्धीने, इथे राहणाऱ्या सर्वांचा ती मनापासून सांभाळ करते. त्यामधे ती राव - रंक, गरीब - श्रीमंत, उच्च - नीच, काळा - गोरा, हिंदू - मुसलमान, मराठी - बंगाली, स्त्री - पुरुष, लहान - थोर, वगैरे असा कुठल्याही प्रकारचा भेद करत नाही. तर ती मातेप्रमाणेच आपल्या ह्या सर्व लेकरांचा सांभाळ करते. अशा ह्या धरणीमातेचे ऋणी राहणे योग्य नाही काय? आपण ह्या मातेचं वर्णन पुण्यभूमी असं करतो. कारण ऋषी - मुनींच्या भूमीत, राम - कृष्णाच्या पदरजाने पुनीत झालेल्या ह्या भूमीत आम्ही जन्म घेतला ही आमच्या दृष्टीने महद् भाग्याची गोष्ट समजली पाहिजे.

भगीरथा सारख्या तपोनिधीने यत्नपूर्वक गंगा भारतात आणली. आणि ही भूमी सुजला, सुफला बनवली. हरीश्चंद्राप्रमाणे सत्यवचनी, शिबी व दधिची समान त्यागी, भीष्मासारखे प्रतिज्ञाशील, कर्णासारखे दानशूर, धर्मराजासारखे धर्मपारायण, अर्जुनासारखे वीर, श्रीमच्छंकराचार्यासारखे समन्वयवादी, चतुर धर्मनेते या भूमीला भूषवून गेले. गार्गी, मैत्रेयीप्रमाणे विदुषी, अनुसया, अरुंधती प्रमाणे पतीनिष्ठ, सीता - सावित्रीप्रमाणे उज्वल चरित्रवान, द्रौपदी कुंती प्रमाणे स्वाभिमानी, दुर्गा लक्ष्मी प्रमाणे शूरवीर, पद्‌तमनी प्रमाणे आत्मसमर्पण सिद्ध, जिजाऊप्रमाणे विशाल मातृत्त्वाची आकांक्षा धरणाऱ्या, देवी अहिल्याप्रमाणे कर्तव्यपरायण, अशा स्त्रियांच्या परंपरेने भारतमातेची कूस उजळून गेली. अशा ह्या भारतभूमीने आमचे, आधी सांगितल्याप्रमाणे केवळ पालनपोषणच नाही तर संस्करण केले आहे. आमची ही भारतमाता कशी व किती समृद्ध आहे हे पाहण्यासारखे आहे. ह्या भारतभूमीच्या शिरोभागी स्वर्गीय नंदनभूमि काश्मीर रूपी मुकुट म्हणून विराजमान झाली आहे. त्याला लागूनच पंजाब हा पाच नद्यांचा प्रदेश व त्यामुळे बनलेल्या अत्यंत सुपीक अशा प्रदेशातून अन्नधान्य अमाप पिकतं. साखर व गूळ अशा गोड पदार्थाची उत्पन्नांची जबाबदारी जणू त्याहून खाली असलेल्या प्रदेशांनी स्वीकारली आहे. कारण त्या भागात मोठ्या प्रमाणात उसाचे उत्पन्न होते. पण सर्व काही खायला मिळालं म्हणजे झालं असे थोडेच आहे. औद्योगिक क्षेत्रात देखील प्रगती आवश्यक आहे. व त्याकरिता लागणाऱ्या कच्च्या सामग्रीची जबाबदारी स्वीकारली आहे ती ओरिसा, बिहारमधील कोळसा, लोखंड, इत्यादींच्या समृद्ध खाणींनी! असे वरपासून खालपर्यंत व पूर्वेकडून पश्चिमेकडे पाहत गेले तर प्रत्येक प्रांताचं असं खास उत्पन्न आहे, वैशिष्ट्य आहे. आणि हे सर्व पाहिल्यावर भारत सुजलां, सुफलां असल्याचे लक्षात येते. अशा या फळाफुलाने समृद्ध असलेल्या

भारतमातेस आपण वंदन करुया! आणि मग लक्षात येतं की अशा ह्या थोर भारतभूबद्दल स्वातंत्र्यवीरांना किती सहजपणे शब्द सुचले असतील "ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला....

अशी ही भूमि पारतंत्र्यात असल्याची खंत स्वातंत्र्यवीरांसारख्या कित्येक क्रांतीकारकांच्या मनात सलत होती. नव्हे, नव्हे तिचे ते पारतंत्र्यात असणे त्यांना असह्य होत होते. ह्या सगळ्यांच्या मनात आमची ही भूमी पारतंत्र्याच्या कचाट्यातून सोडवण्याची एक जिद्द होती. ह्या सगळ्यांच्या नावाचा नुसता उल्लेख करावयाचा म्हटले तरी एक ग्रंथ होईल. म्हणून वानगीदाखल काही नावांचाच उल्लेख करू. ह्या भूमीला स्वतंत्र करण्यासाठी लो. टिळक, चाफेकर बंधू, वासुदेव बळवंत फडके, मदनलाल धिंग्रा, बटुकेश्वर दत्त, खुदीराम बोस, सुभाषचंद्र, चंद्रशेखर आझाद, भगतसिंह, सुखदेव, राजगुरु, इत्यादी ह्या सर्वांना इतरांचे देखील प्रतिनिधी समजून इथेच वंदन करून थांबू या!

भारतमातेकरिता लढणाऱ्या, झुंजणाऱ्या, विभूती ह्या केव्हाही थोरच. नव्हे तर आपल्या भूमीकरता, आपल्या देशाकरता लढणाऱ्या जगातील सर्वच व्यक्ती ह्या थोर होत. ह्या सर्वच व्यक्ती वंदनीय आहेत.

ज्या स्वातंत्र्यवीरांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले, त्या सर्व व्यक्ती थोर तर आहेतच पण त्याचबरोबर स्वतंत्र भारतमातेची शान वाढवण्यासाठी, तिचा ह्या विश्वातील लौकिक वाढवण्यासाठी, ज्यांनी ज्यांनी म्हणून प्रयत्न केले अशा व्यक्ती देखील थोर आहेत आणि वंदनीय आहेत. हे त्या व्यक्तींना पूर्णपणे माहीत होतं की भारतमातेची शान तेव्हाच वाढणार, जेव्हा तेथील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक, आर्थिक, स्वातंत्र्य मिळणार!

अशा प्रयत्नाकरिता झगडणाऱ्यांची देखील सहज एक मोठ्ठी यादी होईल. त्यात समाजातील तळागाळातील व्यक्तीला मान मिळण्यासाठी, त्याला देखील माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळण्यासाठी झगडणारे बाबासाहेब आंबेडकर, स्त्री शिक्षणाकरिता अखेर प्रयत्नशील असणारे ज्योतीबा फुले, सतीसारखी स्त्रियांवर अन्याय करणारी पूर्वापार चालत आलेली रूढी मोडून काढणारे राजा राम मोहन रॉय, हरिजनांच्या उद्धाराकरिता झगडणारे महात्मा गांधी, तेलीतांबोळ्याचे वडिलकीच्या नात्याने नेतृत्व करणारे लो. टिळक, समाजसुधारक आगरकर, अंधश्रद्धेचं समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न करणारे संत गाडगे महाराज, वनवासी भागात राहून वनवासी बांधवांचा उद्धार करणाऱ्या अनुताई वाघ, कुष्ठरोग्यांच्याकरीता आपले अख्खे जीवन खर्ची घालणारे बाबा आमटे तथा शिवाजीराव पटवर्धन, स्त्री शिक्षणाकरिता उभी हयात वेचणारे महर्षी

धोंडो केशव कर्वे ह्या अशा, ह्यातली प्रत्येक व्यक्ती ही नररत्नेच म्हणावी लागतील. भारतासारख्या खंडप्राय देशात सुधारणा घडवून आणण्यासाठी झगडणाऱ्या ह्या सर्व व्यक्तींचा सिंहाचा वाटा आहे. आणि म्हणूनच ह्या व्यक्ती आम्हाला वंदनीय आहेत.

देशाकरिता, ह्या भूमीच्या स्वातंत्र्याकरिता झगडणारे एक एक क्रांतीवीर नररत्न काय, किंवा ह्या देशाची सामाजिक सुधारणा घडवण्यासाठी, आर्थिक विषमता दूर करण्यासाठी झटणाऱ्या ह्या सर्वांचा इथे उल्लेख करण्याचं कारण म्हणजे त्यांनी केलेल्या कामामागे त्यांची धडपड, त्याग, त्यांची निष्ठा हे सर्व करीत असतानाची दिसून येत असलेली त्यांची निस्वार्थ बुद्धी पाहिली की पटतं आणि वाटतं की ह्यातील प्रत्येक व्यक्ती ही ह्या समाजाची माता आहे. त्यांची ही समाजसुधारण्याकरिता चाललेली धडपड ही एखाद्या मातेने आपल्या मुलाकरता, मुलाच्या उत्कर्षाकरता चालवलेल्या धडपडीसारखीच दिसते. आणि म्हणूनच ह्या सर्वांचा उल्लेख करावासा वाटतो तो ह्या समाजाची माता म्हणून.

ह्या समाजाकरता झटणाऱ्या जशा व्यक्ती होवून गेल्या. व जशा काही व्यक्ती झटत आहेत तसेच ह्या समाजात, समाजाचा विकास घडवून आणणाऱ्या काही संस्था देखील आहेत. ह्या अशा संस्था की, ज्या ह्या समाजाला योग्य दिशेला नेण्याचे कार्य करीत आहेत. खऱ्या अर्थाने ह्या समाजाची आई बनून ह्या समाजरूपी पाल्याचे त्या संस्था सांभाळ करत आहेत. आईचे गुणधर्म आपल्यात उतरवणं म्हणजेच, आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणण्यासारखं आहे. प्रत्येकाला थोर व्यक्ती म्हणून नावलौकिक मिळवता येण्यासारखा नाही. आणि प्रत्येकाला ते शक्य देखील नाही. तेव्हा अशा ह्या सामाजिक संस्थाचं सदस्यत्व स्वीकारून संस्थेने नेमून दिलेली कामं करणे, म्हणजे देखील एकापरीने समाजाचं मातृत्व स्वीकारण्यासारखेच आहे.

अशा अनेक संस्थापैकी मी अगदी जवळून पाहिलेली व तिचा सदस्य असलेली संस्था म्हणजे "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ"! ही एक अशी संघटना आहे की ती ह्या देशातील प्रत्येक हिंदू म्हणवणाऱ्यांची, ह्या देशाला अभिमानाने माझा देश म्हणणाऱ्यांची, ह्या देशातील प्रत्येक सुखद घटनांबद्दल आनंद व्यक्त करणाऱ्यांची व प्रत्येक दु:खद घटनामधील दु:खात सामील होणाऱ्यांची, थोडक्यात आपल्या मातृभूमीशी समरस होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची ही संघटना आहे. आणि अशा ह्या संघाचे प्रत्येक व्यक्तीने सदस्य बनून दुसऱ्याकरता पर्यायाने देशाकरता तन मन धन पूर्वक झटावे ही अपेक्षा आहे. असे केल्याने हे

हिंदवी राज्य पुन्हा एकदा वैभवाच्या शिखरावर जाईल व साऱ्या जगतात पुन्हा एकदा दिमाखात उभे राहील.

अगदी त्याच मातेच्या आपल्या पाल्याकडून असलेल्या अपेक्षेने बघत ती आपल्या पाल्याचे पोषण करीत आहे. आणि मला खात्री आहे की तिची सर्व लेकरे स्वगौरवातून आपल्या मातेस वैभवाप्रत नेतील आणि तिच्या त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करतील !

[illegible]
[illegible]
[illegible] २६६२ दिनांक ९।५।९३
वि. [illegible] आ.वा